# सहा सोहळे

(ऋतूंवरील कवितासंग्रह – भाग ३)

रचना

**डॉ. मंजूषा कुलकर्णी**

(साहित्य अकादमी पुरस्कारप्राप्त लेखिका, कवयित्री)

मंजुभारती प्रकाशन

**पुणे**

**सहा सोहळे** (ऋतूंवरील कवितासंग्रह - भाग ३)

**रचना** : डॉ. मंजूषा कुलकर्णी
(साहित्य अकादमी पुरस्कारप्राप्त लेखिका, कवयित्री)
साकेत / २५, जयवंत पालकर मार्ग,
पोद्दार रुग्णालयासमोर वरळी, मुंबई - ४०० ०३०.
भ्रमणध्वनी - ९०८२१६१५२४, ९८२२८३९४९१
Email : drmangushak@gmail.com

**कायमस्वरूपी पत्ता :** २३१, समर्थ अलंकार, फ्लॅट-२,
कवितांच्या बागेसमोर, ज्योतीनगर,
छत्रपती संभाजीनगर - ४३१ ००५.

**प्रकाशक** : सौ. उल्का मंगेश कुलकर्णी
**मंजुभारती प्रकाशन**
'अे' ५०४, महालक्ष्मी पॅलेस,
वेंकटेश शर्विल सोसायटी समोर,
सी.एन.जी. पंपासमोर, पारी कंपनी चौक,
नऱ्हे, पुणे - ४११०४१.

**प्रथम आवृत्ती** : वैशाख कृ. द्वितीया, शके १९४६
शनिवार, दि. २५ मे, २०२४

**अक्षर जुळवणी** : सौ. अनिता विनायक भालेराव
क्रिएशन,
जयश्री, १-एन, सेक्टर ए, एन-१,
सिडको, छत्रपती संभाजीनगर - ४३१००३.
भ्रमणध्वनी - ९४२३३ ९६८८१

**मुद्रक** : स्टार कॉपीयर्स प्रायव्हेट लिमिटेड
कुमठेकर मार्ग, सदाशिव पेठ, पुणे ३०

**ISBN** : 978-81-972775-2-8

**सर्वाधिकार** : © लेखिकेच्या स्वाधीन

**किंमत** : **₹ १५०/-**

सर्व रसिकवरांना
सादर समर्पण...

# मनोगत

निसर्ग माझ्यासाठी सदैव गुरु राहिला आहे. त्याने मला शिकवलं कसं जगायचं, कसं उमलायचं आणि कसं गळून पडायचंही. ‘सहा सोहळे’ हा माझ्या मनाचा तोच प्रवास आहे निसर्गासोबत जगण्याचा, त्याच्याशी एकरूप होण्याचा. मी जेव्हा या कवितांवर काम सुरू केलं, तेव्हा माझ्या मनात एकच प्रश्न होता ‘ऋतू म्हणजे केवळ हवामानाचा फेरबदल की तो मनाचाही प्रवास आहे?’ उत्तर शोधताना लक्षात आलं ऋतूंची सृष्टी ही बाह्य नाही; ती अंतर्मनातील भावना आहे. वसंतात मन उत्साहाने भरतं, उन्हाळ्यात थकून जातं, पावसात धुंद होतं, शरदात शांत होतं, हेमंतात आत्मचिंतन करतं आणि शिशिरात नव्या जीवनासाठी सज्ज होतं. म्हणूनच या संग्रहातले ऋतू माझ्यासाठी जीवनाच्या सहा भावस्थिती आहेत.

‘सहा सोहळे’ लिहिताना प्रत्येक ऋतू माझ्या मनात येऊन थांबला. वसंत आला तेव्हा शब्द उमलले. ग्रिष्म आला तेव्हा ते जळले, तपले. वर्षा आली तेव्हा ओथंबले, वाहिले. शरद आला तेव्हा ते पारदर्शक झाले. हेमंत आला तेव्हा स्थिर झाले आणि शिशिरात थोडेसे गारठले पण त्याच गारठ्यात एक गूढ ऊबही होती.

या सहा भावस्थितींतून मी स्वतःला अधिक खोल ओळखलं. वसंताने मला दिली आशा, ग्रिष्माने दिली शक्ती, वर्षेने दिला विरहाचा अर्थ, शरदाने दिली शांती, हेमंताने दिला आत्मभान आणि शिशिराने दिली नव्या प्रारंभाची अनुभूती. प्रत्येक कवितेत मी निसर्गाला मानवी भावनांसारखा अनुभवला आहे. झाडांची पानं, वाऱ्याचा झोत, पावसाचा नाद हे सगळं माझ्याशी बोलतं. काही वेळा मी स्वतःला झाड मानते. जो वसंतात फुलतो, ग्रिष्मात जळतो, वर्षेत न्हातो आणि शिशिरात निःशब्द होतो. पण त्या शांततेतही जीवनाची धडधड कायम असते.

कविता माझ्यासाठी नेहमीच आत्मसंवादाची जागा राहिली आहे आणि ‘सहा सोहळे’मध्ये हा संवाद निसर्गाशी झाला. मी शब्दांतून ऋतूंना पाहिलं नाही; मी त्यांच्यासोबत जगले. सकाळचा पहिला किरण, संध्याकाळचा लालसर रंग, ढगांचा आवाज, गारव्याचा श्वास हे सगळं माझ्या ओळींतून वाहतं.

या संग्रहात मला सर्वाधिक भावलेली गोष्ट म्हणजे निसर्गाचा चक्राकार प्रवास. काहीच स्थिर नाही, सगळं बदलतंय. पण प्रत्येक बदलामध्ये सौंदर्य आहे. पानगळ जशी दुःखद वाटते, तशीच ती नव्या पानांच्या स्वागताची तयारीही आहे. हा आशावाद मला निसर्गाकडून मिळाला आणि तोच मी कवितांमधून वाटला.

'सहा सोहळे'च्या लेखनानंतर माझ्या मनात एक नवी जाणीव दृढ झाली की जीवन म्हणजे ऋतूंचं रूपक आहे. वसंतासारखे दिवस येतात, वर्षेसारखे भावनिक क्षण येतात आणि शिशिरासारखी शांतताही येते. पण हे सर्व मिळूनच जीवनाचा पूर्णपणा निर्माण करतात.

या कवितांमधून मी प्रत्येक वाचकाला एकच आमंत्रण देते – एक क्षण थांबा, श्वास घ्या आणि आपल्या मनातील ऋतू ऐका. कारण त्या ऋतूंमध्येच आपलं खऱ्या अर्थानं अस्तित्व आहे.

'सहा सोहळे' माझ्यासाठी फक्त एक काव्यसंग्रह नाही; तो माझ्या अंतर्मनाचा कालदर्शक आहे. जसं निसर्गाचं वर्षचक्र पूर्ण होतं, तसंच या कवितांनी माझं मन एका वर्तुळात आणून ठेवलं आहे. अनुभव, अभिव्यक्ती आणि स्वीकार या तीन तत्त्वांच्या संगमात.

शेवटी मला असंच वाटतं – 'ऋतू हे बाहेर नाहीत, ते आपल्या आत आहेत आणि त्यांचे हे सहा सोहळे मनाच्या पाचोळ्यावर उमललेले, जीवनाच्या झाडावर फुललेले.'

**डॉ. मंजूषा कुलकर्णी**

# प्रस्तावना

प्रत्येक ऋतू म्हणजे निसर्गाची एक नवी वेल्हाळ गोष्ट. वर्षभर तो आपल्या अवतीभवती रंग, सुगंध, गंध, गारवा आणि ऊन यांच्या सुरेल संगमातून एक अद्भुत संगीत वाजवत असतो. या संगीताचे सहा अध्याय म्हणजे 'सहा ऋतू' – वसंत, ग्रिष्म, वर्षा, शरद, हेमंत आणि शिशिर. प्रत्येक ऋतू निसर्गाच्या रूपाची एक नवीन मुद्रा घेऊन येतो आणि जीवनाला नवा अर्थ देतो.

डॉ. मंजूषा कुलकर्णी यांच्या 'सहा सोहळे' या काव्यसंग्रहात या सहा ऋतूंना कवयित्रीने केवळ चित्रित केलेले नाही, तर जगलेले आहे. प्रत्येक ऋतू तिच्यासाठी एक सोहळा आहे. सृष्टीसोबत मनाचा संवाद साधणारा, अनुभूतीच्या फुलांनी सजवलेला. तिच्या लेखणीतून हे ऋतू फक्त हवामानाचे बदल नाहीत, तर मनाच्या अवस्थांचे प्रतीक ठरतात.

या संग्रहातला वसंत म्हणजे नवजीवनाचा उद्गार नव्या पालवीचा, नव्या प्रेमाचा आणि नव्या स्वप्नांचा. कवयित्रीच्या वसंतात केवळ फुलं उमलत नाहीत, तर आत्म्यातही एक कोवळं ऊन झिरपतं. पानगळ झालेल्या वृक्षांवरती पुन्हा हिरवळ फुलते, तसंच मनही नव्या आशेने उजळून निघतं.

यानंतर येतो ग्रिष्म. जळजळीत उन्हाचा ऋतू, पण कवयित्री त्याकडे वेगळ्या नजरेने पाहते. तिच्या ग्रिष्मात उष्णतेसोबत कणखरपणा आहे. तो सहनशीलतेचा, धैर्याचा आणि आत्मबलाचा सोहळा आहे. जसं कोरड्या मातीतही जीवनाचं बीज जिवंत राहतं, तसं तिच्या कवितांमधील नायक आणि नायिका या उष्णतेतून स्वतःचं अंतरंग शोधतात.

वर्षा या ऋतूत कविता एकदम ओथंबून वाहू लागतात. पहिल्या पावसाच्या सुगंधाने तिच्या शब्दांना ओल येते. ढगांच्या गजरात तिच्या ओळींमध्ये संगीत दडलेलं असतं. वर्षा तिच्यासाठी केवळ निसर्गाचा उत्सव नाही, तर भावनांचा मुक्त

प्रवाह आहे. पावसाच्या थेंबांबरोबर तिचं मनही टपटपतं आठवणींनी, विरहाने, आणि आनंदाने.

शरद म्हणजे स्वच्छ आकाश, शुभ्र चांदणं आणि मनाची निर्मळता. 'सहा सोहळे'तील शरद ऋतू हा आत्मशांतीचा काळ आहे. कवयित्रीच्या ओळींमधून चंद्रासारखी शीतलता झिरपते. या काळात ती जीवनाकडे नव्या नजरेने पाहते – न शोकाने, न उत्साहाने, तर स्वीकाराने. तिचं मन शांत सरोवरासारखं स्थिर झालेलं दिसतं.

यानंतर येतो हेमंत – जो शरदाच्या शांततेतून पुढे येऊन जीवनात पुन्हा एकदा नव्या तयारीची जाणीव निर्माण करतो. कवयित्रीच्या हेमंतात गारवा आहे, पण त्याचबरोबर एक स्थैर्यही आहे. तिच्या शब्दांत हेमंत म्हणजे आत्मचिंतनाचा काळ – जिथं निसर्ग थोडा थबकतो, मन थोडं थांबतं आणि आत्मा स्वतःशी संवाद साधतो.

आणि अखेरीस शिशिर. निसर्गाच्या विश्रांतीचा, पण नव्या सुरुवातीचा सूचक ऋतू. या काळात कवयित्रीच्या कवितांना एक तत्त्वज्ञान लाभतं. शिशिर तिच्यासाठी समाप्ती नाही, तर नव्या अंकुराची तयारी आहे. तिच्या लेखणीत बर्फाखाली दडलेली हिरवाई हलकेच श्वास घेते.

'सहा सोहळे' या नावातली काव्यमयता म्हणजेच या पुस्तकाचं तत्त्वज्ञान आहे. ऋतू म्हणजे जीवनाचे टप्पे. जन्मापासून मृत्यूपर्यंत, आनंदापासून विरहापर्यंत, प्रत्येक भावना एक ऋतूसारखी येते आणि जाते. पण तिच्या मागे उमटतो एक अनुभव जो आत्म्याला अधिक खोल बनवतो.

कवयित्रीने या संग्रहात प्रत्येक ऋतूला स्त्रीभावाशी जोडून मांडलं आहे. स्त्रीही निसर्गासारखीच बदलत राहते, उमलत राहते, झिजत राहते आणि पुन्हा फुलत राहते. म्हणूनच या सहा ऋतू तिच्या जीवनाच्या सहा अवस्था बनतात. वसंत तिच्या हृदयाचं उमलणं आहे, ग्रिष्म तिची झळ, वर्षा तिचं ओथंबलेलं प्रेम, शरद तिचं शांत चिंतन, हेमंत तिचं आत्मभान आणि शिशिर तिचं पुनर्जन्माचं स्वप्न.

'सहा सोहळे' या संग्रहाचं वैशिष्ट्य म्हणजे त्यातील भाषिक लय आणि संवेदनांची समरसता. प्रत्येक कवितेत चित्रमयता आहे फुलांची, पावसाची, सूर्याची, वाऱ्याची. पण त्याचवेळी प्रत्येक प्रतिमा काहीतरी सांगते अंतर्मनातील

बदलांविषयी. ही काव्यभाषा जणू ऋतूंच्या बदलत्या प्रकाशछटा घेऊनच आकारली आहे.

वाचक जेव्हा हे पुस्तक उघडतो, तेव्हा तो एका वर्षचक्रात प्रवेश करतो. प्रत्येक पानासोबत ऋतू बदलतो, मन बदलतं आणि भावनाही नव्याने जन्म घेतात. 'सहा सोहळे' वाचताना आपण निसर्गाच्या सहा रूपांपैकी एक रूप आपल्या मनात उमलताना जाणवतो.

ही प्रस्तावना संपताना एकच जाणवतं – हा संग्रह फक्त निसर्गाचा नाही, तर मनुष्याच्या आतल्या ऋतूंचाही आहे. कारण शेवटी, प्रत्येक ऋतू आपल्या अंतःकरणातच जन्मतो.

**श्री. राजेंद्र वराडकर**
कार्यवाह,
स्वातंत्र्यवीर सावरकर राष्ट्रीय स्मारक,
दादर, मुंबई

# अनुक्रमणिका


१) बंद काळजाची कळी ... १३
२) जग उगाच वाटे सुंदर ... १४
३) वेळा चुकल्या ऋतूंच्या ... १५
४) तप्त झळा मातल्या ... १६
५) क्षणी सुवास सुखाचा ... १७
६) रेशमाचं पाणी पाणी ... १८
७) ती आणि मोगरी ... १९
८) अनुरागासी नवे खुमार ... २०
९) मीही मृण्मयी होते ... २१
१०) शापित शशीचे चक्र उदास ... २२
११) संगत असता मोहिनी ऋतूची ... २३
१२) बोल प्रीतीचे ... २४
१३) वासंतिक राग ... २५
१४) वसंत बहरला ... २६
१५) ऋतू भावनांचे येती ... २७
१६) असा अनोखा जगू या ग्रीष्म हा ... २८
१७) मधुमास नवा वाटे ... २९
१८) शालीमधल्या आठवणीतून... ३०
१९) गोड पाखरू की अप्सरा ... ३१
२०) नव्या कळीचे नवेनवेपण ... ३२
२१) भीज पावसाची ... ३३
२२) वाट कुणाची पाहते धरणी... ३४
२३) बरवा श्रावण जन्मला ... ३५
२४) हिंदोळ्यावर कधी सुखाच्या ... ३६
२५) आता आली उगवून ... ३७
२६) शरद पौर्णिमा अलंकार जणू ... ३८
२७) जगण्याचे पान असावे ... ३९
२८) सोनचाफ्या गंधबेड्या ... ४०
२९) माणूस आपलं जगणं सारं... ४१
३०) वसुंधरा यौवनात ... ४२
३१) हा बहर सखे ... ४३
३२) वेडी सदाफुली हो ... ४४
३३) तू सोबती असताना ... ४५
३४) वसंतातली वसंतगाणी ... ४६
३५) हृदयात राहता चाफा ... ४७
३६) माझे सुखाचे चांदणे होशील ... ४८
३७) चिमण्या स्वप्नातून रमे आई ... ४९
३८) रंग अलवार हसती ... ५०
३९) मोहरल्या आंब्याचा सुवास दरवळतो ... ५१
४०) धुंद मोगऱ्याची धुंदी ... ५२
४१) मी क्षितिजास लांघतो ना... ५३
४२) सांगा गुलाबवेड्या ... ५४
४३) मनात माझ्या स्वप्नपालखी ... ५५
४४) बेभान नको होऊस तू फार ... ५६
४५) पाऊसधारा ओलित वारा... ५७
४६) स्मृती ओलसर उरते ही ... ५८
४७) असे असावे जीवन टवटव ... ५९

४८) ऋणानुबंधांचे बंध
अगणित ... ६०
४९) किती पावसाळे हे यावे ... ६१
५०) इथे फिरस्ती कितीतरी ... ६२
५१) आषाढातील पाऊसधारा ... ६३
५२) सुख असे का वागते ... ६४
५३) जगणं म्हणजे काय? ... ६५
५४) तू अशी सुंदरी मनु मंजिरी... ६६
५५) मनी श्रावण हा राही ... ६७
५६) बहर होत जोजवणे ... ६८
५७) तू वसंत जीवनी असूनही ... ६९
५८) नवीन वाटे चंद्रमा ... ७०
५९) पागोळ्यांचा नाद झरे ... ७१
६०) मारू नको शर तू मदना रे... ७२
६१) आता पुन्हा नव्याने ... ७३
६२) सजण्या सजती फुलवंती ... ७४
६३) बहरली वेल नात्यांची ... ७५
६४) छेड तू तराणे राजा ... ७६
६५) फुलासारखे फुलायचे की ... ७७
६६) ओल्या पंखांची झळाळी ... ७८
६७) सण भाऊबीज येतो ... ७९
६८) जगता जीवनगाणे ... ८०
६९) जळते अजूनी पणती ... ८१



## (१)
## बंद काळजाची कळी

हिरव्या अळूच्या पानावर
थेंब पाण्याचे जे चार
दव मोत्यांची शोभा ही
स्पर्श दिलाश्याचे गार

रेषा पानाच्या खुलती
पाने वाऱ्याशी डोलती
सृष्टीमध्ये शब्देविन
सारे सारेच बोलती

रंग उमलून येती
ऋतुभराला लेऊन
कळ्या हसतात तेव्हा
गोड फुले ती होऊन

गूज त्यांचेच चालते
एकमेकांशी प्रेमाने
पानं फुलं झुलतात
धुंद हवेशी जोमाने

वाटे दव मी की व्हावे
कधी कलिका फुलेही
बंद काळजाची कळी
अलगदसी खुलेही

दि.२४/०५/२०२४
रात्री १०.२२ वा.



(२)
## जग उगाच वाटे सुंदर

चाहूल कोणती लागे
का मनात प्रीती जागे
उमलून देई स्वप्नांना
हा वसंत वेडा वागे

फुलवीत जातो तो कळ्यांना
गालावरल्या त्या खळ्यांना
नवजीवन देतो वेडा
सुकलेल्या शुष्क मळ्यांना

आणतो कुठून ते रंग
रंगात प्रेम हो दंग
उधळून देई गंधांना
रती मदनमनाच्या संग

हासतात कलिका धुंद
मग हवाही होते कुंद
छेडते कुणी तेथे का
राधेचा छंद मुकुंद

जग उगाच वाटे सुंदर
मन मस्त उधळते कलंदर
प्रेमाची ताकद बघूनी
प्रणयागरी लहरी निरंतर

दि.१९/०५/२०२४
सकाळी ०७.३९ वा.



## (३)
## वेळा चुकल्या ऋतूंच्या

धरा तापली तापली
भुई कासावीस झाली
त्यात वैशाख वणवा
रणरण ऊन्हं व्याली

आग ओकतो रोजच
वर सुर्व्या बसून
मग वाटते उगाच
पाहतो का तो हसून


करा नुकसान तुम्ही
आम्ही रौद्र रूप दावू
माय बाप निसर्गाचा
नका दुखावून देऊ

नाईलाज आमुचाही
राग कसा तो करावा
आपणच निर्मीयले
त्याचा काळ का ठरावा

वेळा चुकल्या ऋतूंच्या
घ्यावा शिडकावा थोडा
कुठे शीतल गारवा
कुठे अवकाळी खोडा

आता तरी सुधरावे
जरा नव्याने पहावे
भाव हळवे जरासे
आम्हासाठी ही ठेवावे

दि.१३/०५/२०२४
रात्री ११.५६ वा.



## (४)
## तप्त झळा मातल्या

तप्त झळा मातल्या
ओकतात आग ही
भुईमध्ये दबलेल्या
उष्म्याला जाग ही

सकाळीच तापतो
तळपतो मार्तंड
राग त्याचा अनावर
ताप वाटे प्रचंड

गरमीचा उच्चांक
अंगी लाही लाही
जीव असो कोणताही
ओरडतो त्राहि त्राहि

दोष निसर्गाचा ना
मानवाचा आहे हा
तोडुनिया जंगलांना
प्रगतीला पाहे हा

घालविली हिरवाई
संकटात धरती आई
आपल्याच विनाशाची
माणसा तुला का घाई

दि.२४/०४/२०२४
रात्री ०८.०३ वा.

## (५)
## क्षणी सुवास सुखाचा

शिडकावा वळवाचा
हुळहुळणारी माती
गंध ओलसर नवा
सर हलकीशी हाती

गेला तापून हा जीव
आग ओकताना रवी
धारा घामाच्या वाहती
वळवाने आस नवी

आसमंत गंधाळतो
अत्तराच्या दाही दिशा
हुंगताना माती वाटे
किती मानावे त्या ईशा

कसे बदलून जाते
सारे हवेसे वाटते
काया शीतल होताना
मनी वर्षा दाटते

असा वळवसरींचा
पडो पाऊस सुखाचा
दुःख पोळताना देवा
क्षणी सुवास सुखाचा

दि.२१/०४/२०२४
रात्री १०.३० वा.



## (६)
## रेश्माचं पाणी पाणी

धुंद पावसाची धार
अंग भिजूनीया गार
चला चला रे पिलांनो
थंडी वाजतेय फार

सारा डोंगर ओघळे
झरझर झऱ्यावाणी
गवताच्या अंगावर
रेश्माचं पाणी पाणी

झाडं अंघोळ करती
स्वच्छ सुंदर दिसती
बीज जमिनीमधले
गोड गालात हसती

पाने पाने चिंब ओली
तरारून मने गेली
रानारानात सुगंधी
माती अत्तरांची झाली

केस अंगावरले हे
असे उभारून आले
करू पानांची छतरी
रान हुडहुडी झाले

या रे पिल्लांनो जवळी
ऊब आईची कवळी
जरा पाऊस पाहू या
त्याची गाणी सोनसळी

दि.०७/०४/२०२४
०९.०४ वा.



## (७)
## ती आणि मोगरी

मोगऱ्याच्या फुलांची करंडी
किती खुणावत राहते न
सुगंधभरल्या डोळ्यांनी
प्रेमाने पाहते न

कधी वाटते अलगद गुंफून
प्रेयसीच्या केसात जावे
कधी फुलांना देवापायी
भक्तिरसात नाहत वहावे

कधी नुसत्याच ओंजळीत
प्रेमाची कबुली देऊ की नको
ह्या गोंधळात कळ्याही म्हणत
बसतात फुलू की नको

किती दाहक उष्म्याच्या
काहिलीचा त्रास
तरीही क्षणात कमी होतो
येताच मोगऱ्याचा सुवास

उगाच वाटत राहते
ती अवचित  येईल
मोगरीसारखी तिच्या प्रीत गंधात
मला बुडवून देईल

ती आणि मोगरी
सारख्याच वाटतात
ओसाड रुक्ष वातावरणात
परिमळ देत भेटतात

दि.०५/०४/२०२४
सकाळी ०९.३२ वा.



## (८)
## अनुरागासी नवे खुमार

तृषार्त धरणीवरती बरसल्या
पाऊसधारा जल्लोषे
कणकण गेला ओलावून हा
अंगोपांगी जल कोशे

थेंब पाणेरी टवटव टपटप
जीवन देती सुकलेल्यां
चैतन्याचे ओघ वाहती
सुख बरसाती मुकलेल्यां

सळसळ सळसळ वाहे धबधबा
झरे नदी होऊन जाती
कीट पतंग नि खग मानुषही
आनंदे जलसुर गाती

अशात हाती हात असावा
प्रियवर कोणी साथीला
दुःख भोगल्या ग्रीष्मालाही
कोंब फुटू दे सुख पातीला

स्वर्ग धरेचे मीलन होता
अंकुर येतील नवजन्मा
पुन्हा नव्याने पल्लव फुटतील
डोलू लागतील नव्या खुणा

चक्र ऋतूंचे फिरते ऐसे
क्षणात शमतील दुःख धुमार
खळी खुलावी कळी उमलावी
अनुरागासी नवे खुमार

दि.२८/०६/२०२४
सकाळी ०९.५२ वा.



## (९)
## मीही मृण्मयी होते

गंध मातीचा ओल्या आला
मनास लुभवून गेला
मन मातीत रुजून येता
कोंब सुखाचा उगवून आला

श्वासासंगे ओलही भरली
रुक्ष तापत्या ह्रदयात
आत वाहिले शीतल वारे
मंद्र भाव मग उदयात

जिकडे तिकडे जळ सळसळते
रुधिर सुखावून गेले
पहिल्या वहिल्या पावसाने मज
चिंब ओलेती केले

पंख फडफडुन उडले खगही
ओल्या आकाशात
मंद सांज ही पसरून गेली
धुंद स्वप्नराज्यात

किंचित जमले जळ एकत्र
साचून तळुले सान
हळूहळू थेंबांची सरगम
ऋतू मल्हारी गान

पहिला पाऊस गंध नवेली
नवीच मीही होते
मंद दरवळे मृन्मय परिमळ
मीही मृण्मयी होते

दि.०९/०६/२०२४
दुपारी ०३.०० वा.



## (१०)
## शापित शशीचे चक्र उदास

चंद्र म्हणाला नकोच आता
विरही नभातून एकटे राती
जरा कळ्या मी होऊन जावे
गंध घेऊनी फुलेही साथी

उगाच वेड्या चांदण्यातली
दिशाहीन का भासे भ्रमंती
उद्यानातील फुलाफुलांची
परिमळलेली गोड संगती


लुकलूक करतील लक्ष चांदण्या
तरीही दूर त्या गावी राहतील
कळ्या फुलांच्या कोषांमध्ये
दडवून सुरभी दिव्या पाहतील

इथे अमावस अर्ध मास मी
झुरतो उरतो काहीच ना
तिथे फुलांचे उत्सव फुलण्या
मुहूर्त कसले नाहीच ना

ऋतू कसे मी इथून पाहणे
तिथे ओथंबुन भिजणारे
इथे प्रियेच्या आठवणीने
डोळे माझे थिजणारे

म्हणून वाटते नको आताशी
शापित शशीचे चक्र उदास
रोज नव्याने उमलून यावे
कळ्या फुलांचे मोहक हास

दि.०२/०६/२०२४
सकाळी ०८.०४ वा.



## (११)
## संगत असता मोहिनी ऋतूची

मजसी खुणावे वाट हरितसी
सळसळ चैतन्याची
उडून जाती क्षणात दुःखे
सुखे मिळती जणू पुण्याची

पर्वतरांगा धुक्यात लपल्या
आकाशाचे धुरात घर
झाडांवरती कोंब कोवळे
नवी जीवने फुलली वर

हिरवळ खाली हासून गाली
खळी पाचूची खुलवीत
सांजसकाळी निसर्गराणी
मोहविते मज भुलवीत

उतरून येती स्वर्गातून मग
आकांक्षा देवत्वाच्या
सतत वाटते शीश झुकावे
पुढती सुंदर दिव्यत्वाच्या

वाट कुठे जाते ही दूरवर
आत आत मजसी नेते
क्षणात माझे एकटेपण हे
संपून कैसे हो जाते

म्हणून रमते मीही हिच्याशी
सांगत मनीच्या गुजगोष्टी
संगत असता मोहिनी ऋतूची
नाही दिसत मी कधी कष्टी

दि.२९/०५/२०२४
सायं. ०६.१२ वा.



## (१२)
## बोल प्रीतीचे

बोल प्रीतीचे ऐकण्या
मन अधीरले किती
जन्मभराची प्रतीक्षा
उरी धडधड भीती

आस लागली जीवाला
जीवलग माझा झाला
असे पडताच स्वप्नं
ऋतुराज वनी आला

उमलल्या ह्या कळुल्या
गंधाळून ग पाकळ्या
लाजलाजून हासल्या
गाली गुलाबाच्या खळ्या

अंग अंग शहारले
मनी कारंज फवारे
तुषारांच्या आनंदात
बेभानले प्रीतवारे

आता देशील होकार
जीवनात ये सकाळ
प्रीत जगण्याचे सार
असो प्रेमाचा सुकाळ

दि.०४/०४/२०२४
सकाळी ०९.४८ वा.



## (१३)
## वासंतिक राग

कुहुकुहू सुरात येते जाग
गा कोकीळ वासंतिक राग
फुलली पाने कळ्या उमलल्या
बहरते मनी प्रीतीची बाग

स्वच्छ सकाळी स्वच्छ नभातून
खगमाळांच्या रांगा उडती
यौवनातल्या गुजगोष्टींनी
पानोपानी कलिका दडती

झुळूक हवेची शीतल येते
थंडावा जगण्याला देते
सुगंध सारे वाऱ्यावरती
अत्तर कुपी उघडूनिया जाते

बने मोगऱ्याची खुलून हासली अन
तिथे जाग गुलमोहराला आली
नभी रंग येती नव्याने नवेसे
नवी दृष्टी सृष्टीत डुंबून गेली

मला वाटते जन्म येथे रूळावा
मधुमास हृदयात ऐसा फळावा
फुलांच्या परागात लपले जे भाव
तुलाही असा भाव सहजी कळावा

दि.२७/०३/२०२४
सकाळी ०८.३८ वा.



## (१४)
## वसंत बहरला

तिने एकदाच प्रेमळ नजरेनं पाहिलं
तो तिचा होकार वाटला
वाटलं जीवनाचा शिशिर सरला
मनात सरसर वसंत बहरला

वाळलेल्या सुकलेल्या
प्रेमाच्या झाडाला
हिरवेगार कोंब फुटले
प्रीतपालवी खुलून सारे
मदनाचे वारे सुटले


तो दिवस कधीच विसरलो नाही मी
अजूनही मनाच्या तळाशी आहे ना
ती नाही मिळाली पण तिची ती नजर
चोरून मला पाहे ना

कित्येक वसंत आले,
सृष्टीला फुलवून गेले
तिचे माझे भेटणे जरी राहून गेले
मी मात्र त्याच वसंताच्या,
अजूनही नादात आहे
प्रीत माझी घरी दारी,
अनामिक वादात आहे

'ही' म्हणते काहीतरी अपुरं अपुरं वाटतं
मन तुमचं माझ्याशी अर्धमुर्ध भेटतं
किती वर्षे लोटली तरी तुम्ही माझे पुरे
नाहीच
कोण आहे ती,
जिच्याकडे काळीज तुमचं रेटतं

कसं सांगू, पुन्हा तो फुललाच नाही
तसा वसंत खुललाच नाही
तिचा हा वेडा पुन्हा
कधी कुणावरच तितकासा भुललाच नाही

दि.२३/०३/२०२४
दुपारी ०३.३७ वा.



## (१५)
## ऋतू भावनांचे येती

हळुवार पालवीचे
ऋतू भावनांचे येती
कळ्या कोंब प्रीतभरल्या
मज ओंजळीत देती

विरहातला शिशिर हा
झडतात मीलनेही
भेटावयाची आस
आतूर की मनेही

फुलतात रंगभरली
सुमने मनात सारी
मधुमास गंधभरला
येतो तशात दारी

सृष्टी नवीच होते
कोकीळ कंठ गाई
मोहोर आम्रतरुवर
मादकता ठायी ठायी

प्रणयास जाग येते
हृदयी वसंत फुलता
जणु स्वर्ग लाभतो मज
प्रिये बाहुतून झुलता

ठेवू जपून सारे
मनकोंदणी पिसारे
ऋतू हा वसंत वेडा
वेडातले धुमारे

दि.२२/०३/२०२४
संध्याकाळी ०७.१७ वा.



## (१६)
## असा अनोखा जगू या ग्रीष्म हा

सरस तीरावर गुलमोहराची
वाट किती देखणी
टाकत अलगद पाऊल त्यावर
स्वप्नांची रेखणी

लाहीलाही होते उन्हाने
ग्रीष्माची काहिली
तशात येथे तुझी राजसा
स्मृती जळी राहिली

थंडाव्याची रम्य ठिकाणे
सोबतीने चालली
तूही प्रीतीने मज केसांतुन
मोगरी जी माळली

कुठून एवढी उमेद येते
रखरखणाऱ्या उन्हात
जाळतो शोषतो सुकवतो ऋतू जो
तरी पालवी मनात

जळात शीतल सुवास भरले
सुगंध पुष्पातुनी
परिमळणारा वारा वाहतो
रानारानातुनी

नौकाविहारा येई प्रियवरा
तुषार दे उडवुनी
असा अनोखा जगू या ग्रीष्म हा
आठवास घडवुनी

दि.१९/०३/२०२४
रात्री ०७.४१ वा.



## (१७)
## मधुमास नवा वाटे

पाहतो तुला नव्याने
डोळ्यात वाच प्रेम
लागेल का तसाच
तुजला मदन नेम

बुडतो अजूनही मी
गहिऱ्या तुझ्या नशेत
डोळ्यात भाव खोल
पडतो पुन्हा नशेत

गंधात हरवतो बघ
केसात मोकळ्या त्या
देतो मनात उमलून
प्रीतीच्या पाकळ्या ज्या

स्मरते तुझी प्रतीक्षा
माझ्याचसाठी झुरणे
अर्पून सारे काही
माझ्याचसाठी उरणे

ओठात मौन बोले
मुखडा उदासवाणा
होतो तुझाच आहे
असणार मीही राणा

भेटू पुन्हा नव्याने
मधुमास नवा वाटे
ती ओढ तो भरोसा
सहवास हवा वाटे

दि.०१/०३/२०२४
रात्री ०९.१४ वा.



## (१८)
## शालीमधल्या आठवणीतून

खळखळ खळाळणाऱ्या झऱ्या
तुझे वाहणे शांत
धुक्यात झाडेवेली हरळी
मौन थिजली निवांत

पानापानावरून शिरशिरी
हुडहुडणाऱ्या कळ्या
फुले थांबली जरा फुलाया
शीतशरदी आगळ्या

घरट्याध्ये पंखाखाली
पिले ऊब पांघरली
गवतावरती कुणी इथे ही
थंडी कडक अंथरली

पाण्यावरती होऊन स्वार हा
पवन होई शीतल
अजून झोंबतो कणाकणाला
कुडकुडते ती कळ

परस्परांना बोलू न शकती
ध्वनी गार गारठले
आखडून गेल्या तनुवर शैत्य
अजून किती तारठले

असा हा ऋतू कुडकूड करतो
तरी हवा वाटतो
शालीमधल्या आठवणीतून
मनी परी दाटतो

दि.२६/२/२०२४
रात्री ११.४८ वा.



## (१९)
## गोड पाखरू की अप्सरा

चल ना काडी काडी जमवून
बांधू आपुल्या माडीला
सखे साजणी सोबत असशील
प्रीत घरत्याच्या जोडीला


येईल पाऊस किती बरसावा
घरात आपल्या राहू ग
आणीन दाणे चोचीतून मी
चित्र गोड ते पाहू ग

स्वप्न घराचे तुझे नी माझे
चल लवकर ग पूर्ण करू
ऋतू कोणता जरीही आला
मिळुनी त्याला कवेत धरू

तुझ्यासवे मी जगतो जगणे
आनंदाने भराभरा
क्षणभर थांबू इथे विसावू
तुला पाहू दे प्रिये जरा

बघ राणी मज नजरेतून तू
गोड पाखरू की अप्सरा
अनुनय करतो तुझा सारखा
तुझाच मी प्रियवर ग खरा

दि.११/०७/२०२४
सकाळी ०८.४४ वा.



## (२०)
## **नव्या कळीचे नवेनवेपण**

काळी माती हिरवी फांदी
कळी कोणती न ठाऊक
उमलून येईल कळेल तेव्हाच
रंग रूप तिचे भावुक

म्हणून फुलविणे जरुरी असते
तसे पोसणे माहीत
असू द्यावी की जाण तयाची
खुणा शोधणे काहीत

काय हवे ते पुरवीत जाता
जीव आकार घेई
पोषक वातावरणामधुनी
असणं साकार होई

श्वास जरा मोकळा तो द्यावा
जरा मोकळ्या वाटा
आपुलकीचा गंध मिळावा
काय करे मग काटा

अंगा अंगावरती ऋतूंची
शाल मऊ पांघरता
आले वादळ तरीही न राही
पाकळीही गांगरता

रोज नव्याने नव्या सकाळी
नवेच होऊन जाणे
नव्या कळीचे नवेनवेपण
सदा नवेले रहाणे

दि.१६/०७/२०२४
रात्री ११.५४ वा.



## (२१)
## भीज पावसाची

भीज पावसाची शीतल शहाऱ्याची
धुंद राहण्याची ही संगती अशी
गाभुळला ऋतू जाई उतू उतू
भावनांची हुतुतू संमती कशी


धुरव्यात धुकं काळजाचं ठोकं
बधिरलं अंग अंग दंग होत बसं
नजरेत लाज तिचा दाटलाय साज
कोपऱ्यात डोळ्याच्या अलवार हसं

छत्रीत एका, बिलगून एकमेका
तुझ्या माझ्या भावनांचा,
उंच उंच झोका
जरा जरा थांब, जाऊ दोघे लांब लांब
बरसात प्रीतधारा, मधुरसा मोका

दिनरात हवा, आशा पाखरांचा थवा
बेहोशीचा नवा, रंग सांग सख्या मला
काय तू बोलावे, काय मी सांगावे
शब्देवीण गूज माझे, कळावे की तुला

ऋतू पांघरावा, थंड तुषार फवारा
अत्तराचा फाया, उडे मातीतून सारा
टवटवी फुलवीत, आली नाचत उडत
बावरून गेली की ही वर्षाव धारा

दि.२७/०७/२०२४
सकाळी ०८.२१ वा.



## (२२)
## वाट कुणाची पाहते धरणी

पावसातली हिरवळ कवळी
छटा निराळ्या सुंदर
कसे मी रमते त्या रंगातून
मोद मिळे अपरंपर


कुणी निर्मिले रंग अनोखे
बहर बहरुनी येते
वसुंधरा का प्रिया मीलनी
अशी मोहरून येते

अंगावरती हिरवी वसने
हिरवा शालू नेसून
वाट कुणाची पाहते धरणी
सजून धजुनशी बैसून

अंगाखांद्यावरी तियेच्या
प्रेमांकुर रुजताना
प्रियतम वर्षावात सखी
बेधुंद अशी भिजताना

अधरांवरती गीत तियेच्या
आपसूक उमटून येते
भेट अनोखी वर्षा ऋतूची
नयना मिटून घेते
ती नयना मिटून घेते

दि.१२/०८/२०२४
रात्री ११.५७ वा.




**(२३)**

## बरवा श्रावण जन्मला

मोद भरला आसमंती
तो बरसला उन्मला
मास मधु येऊन जाता
बरवा श्रावण जन्मला

फिरती मधुकर पुंजिका
वनराणीच्या अंचला
पुष्पिकांना उमलविण्या
बरवा श्रावण जन्मला

पालवीच्या तोरणाला
कोंब वेडा दंगला
रंग हिरवे ओतण्याला
बरवा श्रावण जन्मला

ऊन पाऊस पाठशिवणी
इंद्रधनुचा कुंचला
चित्र देखणे रेखण्याला
बरवा श्रावण जन्मला

नभ धरेच्या भेटण्याची
आस वाढते चंचला
मीलनाच्या सोहळ्यातून
बरवा श्रावण जन्मला

दि.२३/०८/२०२४
सकाळी ०९.३१ वा.



## (२४)
## हिंदोळ्यावर कधी सुखाच्या

कुठून आणीशी रंग कोवळे
पोत कोवळी लाली
नवीच येते जन्माला ही
पल्लव नवी नवाली

रेखा त्यावर स्पष्ट उमटती
नसा नसातून रस तो
वाटे भविष्याचे हे मोहक
चित्र रेखितो सरस तो


इवल्या इवल्या पानांवरती
भार भराचा असतो
ऋतू सांडती येती जाती
तरु बहराचा असतो

पुन्हा पहावे वाटे कधी जर
रूप कोवळे तान्हे
शक्यच नाही कधीही असे का
काळ न मागे जाणे

पुढे पुढे ते केवळ पुढती
मुकाट चालत रहाणे
जे जे आहे रेखांकित ते
भाळी भोगत जाणे

हिंदोळ्यावर कधी सुखाच्या
दुःख हेलकावे तर
संचित आपुले गतजन्मीचे
मानून घ्यावे ते तर

दि.१८/०९/२०२४
रात्री ०८.३७ वा.



## (२५)
## आता आली उगवून

तुझ्या माझ्या हाती आलं
सुखासुखी दान
आयुष्याचं नवं नवं
पालवीचं पान

गेले होते ऋतू सारे
येऊन भराला
उंबऱ्याच्या आत मन
रिकामं घराला

फोल फोल जगण्याचा
डोह खोल खोल
नाही जे मिळाले त्याचे
किती किती मोल

आता आली उगवून
पहाट नवी
मावळू न द्यायची
जी उषा हवी हवी

दि.२८/०९/२०२४
सकाळी ०९.१२ वा.



## (२६)
## शरद पौर्णिमा अलंकार जणू

शारद पुनव ही नवान्न पोर्णिमा
म्हणुनी गणली जाते
कृषीवलांच्या घरी संपदा
धान्यलक्ष्मी ही रहाते

अश्विन मासी नवरात्रीच्या
शुभे पाऊले येते
विजयादशमी देऊन विजया
बळा वाढवून देते

नवीन आले धान्य जे घरा
कणग्यांमधुनी चला हो भरा
वर्षभराच्या अन्नासाठी
शेतामध्ये कष्ट की करा

नवान्न अश्विन पोर्णिमेस हे
नैवेद्या दावूनी
सुरू करायचे आता पहायचे
पदार्थ ते खाऊनी

नव्या तांदुळाची खीर करुनी
कोजागिरीच्या राती
जे धान्य आले घेऊन हाती
लक्ष्मी मातेसाठी

असा सोहळा भारतीय हा
अन्न परंपरेचा
शरद पौर्णिमा अलंकार जणू
प्रियतम युगंधरेचा

दि.१७/१०/२०२४
सकाळी ०६.५३ वा.



## (२७)
## जगण्याचे पान असावे

जीवन म्हणजे पर्ण इवलुसे
जीवनचक्राच्या झाडाचे
गतजन्मीचे संचित मूळ हे
कर्म अनामिक त्या खोडाचे


वृक्ष वाढतो पुण्य पापाचा
पाने लगडून जाती काही
अगणित जन्म जे जीवा लाभती
मानव मंजिरी त्याविण नाही

ऋतू वेगळाले ते येती
काही सुखाचे अन दुःखाचे
अंगी बळ हे हवे झेलण्या
तडाखे अवचित की वादळाचे

हळूच बुद्धी व्हावी ऐसी
दुर्गुण दुष्प्रवृत्ती हो गळावी
नको ते सारे  कोरून काढून
हवी ती नक्षी रेखून द्यावी

कुणी न विसरेल ऐसे काही
हे जगण्याचे पान असावे
नक्षीमधल्या रेषांमधुनी
भाग्य आपुले अलगदसे हसावे

दि.१९/१०/२०२४
सायं. ०५.५१ वा.



## (२८)
## सोनचाफ्या गंधबेड्या

सोनचाफ्या काय झाले ना कळताना
पावसाचे अंग झाले उमलताना

एक टोक फांदीवरले का गहिवरले
पान पान आठवांनी का थरथरले

एक गेला पानगळतीचा ऋतू जो
आसवांनी सांडला होता उतू जो

एकटा फांद्यासवे जगताच आला
बागडून मधुमास बहरा धुंद झाला

पल्लवांच्या विभ्रमांना रंग आले
कोवळाले नवनवाले कोंब आले

डोकवून आल्या कळ्या ज्या हासऱ्याशा
अन फुलांच्या हिंदोळी झुलल्या जराशा

पावसाने चुंबिले त्या पाकळीला
उमटूनी आल्या दवांच्या त्या खळीला

सोनचाफ्या लाजणाऱ्या लाजवेड्या
बांधती आम्हा तुझ्या रे गंधबेड्या

दि.२२/१०/२०२४
रात्री ०८.३७ वा.

## (२९)
## माणूस आपलं जगणं सारं

पहिल्यासारखा गारवा आता
गावोगावी उरलाच नाही
थरथरून थंडीमध्ये
हात कुणी धरलाच नाही

शेकोट्यांची ऊब होती
अंगणामध्ये रस्त्यामध्ये
आता फॅशन म्हणून जॅकेट
प्रत्येकाच्या अंगामध्ये

उन उन जेवणासाठी
चुलीभोवती गराडा
गरमागरम भाकरीसंग
चव द्यायचा मस्त खरडा

अंघोळीला सुट्टी व्हायची
गप्पा गरमा गरम
ताटामध्ये वाफाळलेला
भात नरमा नरम

कुडकुडत दात वाजायचे
दिवाळीच्या अभ्यंगाला
फराळ आणि फटाक्यांची
मजा यायची दंग्याला

चुलीतल्या निखाऱ्यांनी
ऐकले होते गूज कुणाचे
शेकता शेकता मन मोकळे
होत असे प्रत्येकाचे

आपलं माणूस कुशीत यायचं
बाळ आईला बिलगायचं
दुःख आपसूक थंडीसवे
आपुलकीने विलगायचं

का असे ऋतू फिरले
बेभरवशी वागणं आहे
माणूस बदलून गेला आहे
सृष्टीला डागण्या देत राहे

कसली थंडी कसली गरमी
पाऊस तर कधीही येतोय
माणूस आपलं जगणं सारं
आपणच विनाशाला नेतोय

दि.२८/११/२०२४
रात्री ११.३८ वा.



## (३०)
## वसुंधरा यौवनात

वसुंधरा यौवनात
येते वसंतात ती भरात
कुहू कुहू कुजन करून कोकीळ
गाईल मधुर स्वरात
नवीच स्वप्ने जागी मनात
येते वसुंधरा यौवनात...

नव्या पालवीसंगे फुटतील
कोंब नव्याने धरतीला
रंग आगळे ढंग वेगळे
चढतील गंधित मातीला
नवीच स्वप्ने जागी मनात
वसुंधरा यौवनात..

परिमळ सुंदर पसरून जातील
फुले दिव्यशी उमलून जातील
नवी चेतना नवी प्रेरणा
नव आकांक्षा हृदयी राहतील
नवीच स्वप्ने जागी मनात
वसुंधरा यौवनात..

हिरवा हिरवा कंच शालू ती
अंगावरती लेऊन शोभे
ऋतुराजाच्या आगमनाने
लहर चैतन्याची गाजे
नवीच स्वप्ने जागी मनात
वसुंधरा यौवनात..

मऊमऊ हिरवा दिसे गालिचा
हरिततृणांच्या मखमालीचा
पाचू सांगा कुणी अंथरले
सूगंध हुंगुन घ्या मातीचा
नवीच स्वप्ने जागी मनात
वसुंधरा यौवनात..

दि.०४/०२/२०२५
सकाळी ०४.५८ वा.



## (३१)
## हा बहर सखे

हा बहर सखे तुझ्या
अंगा खांद्यावर
तुझीच मोहकता त्या
फुला फांद्यावर

उमलून आल्यात तुझ्याच
मनाच्या कळ्या इथे
वसंताविना कसे काय
बहरणे कुणी कुठे

रंगही सगळे उजळलेत
अंधारल्या निशेचे
ढंगही आता बदललेत
पेंगुलेल्या उषेचे

आता आभाळ येतं
बरसताना हातात
प्रीतीमध्ये मग
कोकीळही गातात

तुझ्याकडे पाहत पाहत
जन्म अपुरा पडावा
प्रेमाच्या किमयेने
योग असा घडावा

दि.२३/०२/२०२५
रात्री १०.४८ वा.



## (३२)
## वेडी सदाफुली हो

फुलणे सदाफुलीने
नेहमीच ना ऋतुने
बघ रंगही तिचे ते
ठरले नियम ऋतुने


झाली जरा बदलली
ती रंग न्यारी ल्याली
पिवळ्या धमक शगुनी
मध्ये लाल बुंद लाली

आता स्वतःच वेडी
भुलुनी स्वतःवर गेली
गाली तिच्या उमटली
हसली खुलून आली

जग वेगळेच वाटे
जरी पाने तीच नशिबी
झाली कधीच नाही
तरीही उगा हिशेबी

आपुल्याच प्रेमी पडली
किमया कशी ही घडली
वेडी सदाफुली हो
रंगावर आज अडली

दि.१५/०३/२०२५
सायं. ०६.५३ वा.



## (३३)
## तू सोबती असताना

तू सोबती असताना
चांदणे उन्हाचे होते
गीत एक आपोआप
सारंगी मनाची गाते

तू सोबती असताना
सागरा भरती येते
आकाशाची नदी मग
ओथंबू वाहू पाहते

तू सोबती असताना
मोगऱ्याचा गंध फळे
भर उन्हाळ्यात सखी
सौख्य काय मज कळे

तू सोबती असताना
गुलमोहराची वाट
प्रीत झरे कलश हा
काळजाचा काठोकाठ

तू सोबती असताना
धुंद धुंद धुंदी एक
तू अशी ये जीवनात
गडदशी भाग्य रेख

दि.२३/०३/२०२५
रात्री १०.४९ वा.



## (३४)
## वसंतातली वसंतगाणी

वसंत येता उसंत लाभे
मनास वेड्या काही
मदन मनातून जागा होतो
स्वप्न दाखवत राही

झाडे वेली नव्या पालवी
नव्या रूपाने नटती
हिरवाईने सृष्टीमधल्या
पारणे डोळा फिटती

कुहुकुहू गाते सूर कोकीळ नि
आम्रतरुशी मोहोर
गंधित वारे जळी तुषारे
उमलून भावफुलोर

कर हा करी घेऊन प्रियवरा
उद्यानात विहार
सुगंध घेऊन येतो पवनही
मनात सुरभी सार

वसंतातली वसंतगाणी
वसंत उमले आत
वसंत वाटे सखा जवळचा
वसंत हा हृदयात

दि.३१/०३/२०२५
सकाळी १०.०८ वा.



## (३५)
## हृदयात राहता चाफा

मनातल्या चाफ्याला
दरवळायला सांगा न
ऋतू कोणताही असू द्या
कळीस फूल व्हायला सांगा न

कधी पहाड लाभे कणखर
रुजण्यास रोपटे आत
कधी मऊशार भूमीच्या
आतून कोंब रुजतात

ना गंध चाफ्याला मिळतो
एक सोनचाफा अपवाद
किती सोसत जातो चाफा
कठीण लोकापवाद

ते गुच्छ काही बोलतात
परी उंच राहतो चाफा
मन गुंतून जाता तेथे
मग हळूच बोले चाफा

कुणी कधीच दखल ना घेती
तरी फुलवून द्यावा चाफा
आत एक कहाणी होईल
हृदयात राहता चाफा

दि.१७/०४/२०२५
रात्री ११.५९ वा.



## (३६)
## माझे सुखाचे चांदणे होशील

वाटलं मला आता तू
माझे सुखाचे चांदणे होशील
किती अंधाऱ्या राती नंतर
आल्हादाची गाणी गाशील

दैवदत्त अमावस्येच्या
खाईत गर्द दुःखाच्या
आयुष्य मज होरपळले रे
वाटा दावशील सुखाच्या

देईन तुला ऊन साहून
आजही सावलीच दाट
भावसरिता ओथंबलेली
आसुसलेला तिचा काठ

कुठेतरी मनामध्ये
पौर्णिमा उजळली आहे
चांदण्याच्या वाटेवरती
स्वप्नवेली फळली आहे

तुला कळेल का कोणास ठाऊक
चांदण्याचा चंद्र होणं
दुःख माझे दूर नेता
ग्रीष्म दाह मंद्र होणं

दि.१८/०४/२०२५
सकाळी ०७.११ वा.




## (३७)
## चिमण्या स्वप्नातून रमे आई

चिमणे चिमण्या मस्त दंगल्या
डहाळीवर झुलत्या
चिव चिव चाले धुंदीमध्ये
ऋतुराण्या फुलत्या

हिरव्या हिरव्या पालवीत का
लपाछपीचा डाव
जागवीत ह्या जाती चिमण्या
सुखासुखीने गाव

त्या असताना जाग सहजशी
नीज चिमणीची होते
चिमणी गाणी गात बाळाची
आई अंगाई गाते

मग येती ह्या चिमण्या राण्या
कथेतल्या नायिका
चिमण्या ओठाच्या बाळाचा
गोड पापा प्रत्येका

चिमण्या जिवनीमधुन डोकवती
चिमणे चिमणे दात
चिमण्या स्वप्नातून रमे आई
चिमण्या पापणी आत

दि. २५/०४/२०२५
सायं. ०६.३८ वा.



## (३८)
## रंग अलवार हसती

अशी गुलाबी जांभळटसर
सांज पुलाशी उतरली
क्षितिजावरती निशा जराशी
अलीकडेच घसरली


रात अजून व्हायची आहे पण
लोचनी पहाट झाली
स्वप्न दंगले मीही रंगले
स्वर्ग छटा ये खाली

किती हळवीशी मंद्र थंडीही
चाहूल देऊन जाते
वाट वेगळी तुझ्यासवे मज
दूर घेऊन जाते

जळात सांडून केशरासवे
रंग कितीसे सुंदर
झुलते वाकून भुलते वेडे
जलराणीवर अंबर

टेकून बसता जरा सेतुशी
दोन जोडण्या दिसती
तुझ्या नि माझ्या नव्या जीवनी
रंग अलवार हसती

दि.२८/०४/२०२५
सकाळी ०५.५३ वा.



## (३९)
## मोहरल्या आंब्याचा सुवास दरवळतो

ऋतुराज येतो अन मोहरल्या
आंब्याचा सुवास दरवळतो
इतका मादक असतो तो
की मदनबाण का,
ते हुंगल्यावरच कळतो

मग कोकिळेचे कूजन सुरू होते
आणि आम्रतरूवर
इवलासा अंकुर डोकावतो
कैऱ्यांच्या हिरवाईतला
फळांचा राजा फोफावतो

हळूहळू कोय धरू लागते
ती इटुकली कैरी
अवकाळी वारा पाऊस न ठरो
तिच्यासाठी वैरी

मग काय बघावे वयात येतानाचे
तिचे रेखीव आखीव कोरीव रूप
कवळी कच्ची असताना ती ती असते
कुठून तिला मिळते बरं
त्याचे आंब्याचे स्वरूप

मग पाडाला पिकलेल्या त्या कैरीची
आंबट गोड चव
जिभेवर अशी काही रुळते
वर्षभर वाट पाहून तरसलेली रसना
त्या स्वर्गीय गोडीने फळते

आमराई असो घरात पिकत घातलेली
आंब्याची वाडी असो
नुसता घमघमाट मधुर मंजु रसाचा
सारा ग्रीष्म सुखात वसो

दि.२९/०४/२०२५
रात्री ११.४३ वा.



## (४०)
## धुंद मोगऱ्याची धुंदी

धुंद मोगऱ्याची धुंदी
काही उत्तरच नाही
भर उन्हाळ्यातली सुगंधी पर्वणी
काही सरतच नाही

इकडे वाढताना उन्हाच्या झळा,
जीवाची काहिली होते
तेवढ्यात एक झुळूक मोगऱ्याचा
सुरभित चिंब होऊन येते

मग उन्हाचा त्रास म्हणत
कटकट करावी की
मोगऱ्याचा सुवासाने
मनाची करंडी भरावी

देव पण असा महान आहे खरंच
दुःखाचा असह्य उन्हाळा देताना
सुख कुठेतरी मोगऱ्यासारखं हरखून जावं
एक गोड मोहक सौरभ घेताना

म्हणूनच दुःखाचा उन्हाळा
येऊ द्यावा यायचाय तेंव्हा
सुखाच्या मोगर परिमळात
हलकेसे दिलासे मिळतात जेंव्हा

दि.०१/०५/२०२५
रात्री १०.५४ वा.



## (४१)
## मी क्षितिजास लांघतो ना

फुलल्या कळ्या कळ्यांनी
रंगात रंग भरले
काहीतरी मनीचे
तेंव्हा मनात ठरले

कुजबुजल्या कानी तेंव्हा
उमलून आल्या भावा
लोटून लाट गावा
जातात छंद नावा

येता सुगंध आतून
वाराही नेतो वाहून
खुलते कळी कळीही
ऋतुराज जवळी पाहून

चैतन्य सळसळे अन
भाषा अबोल बोले
आहे कुणीतरी जो
हलकेच मनी डोले

हा आसमंत भाळून
धरणीस सांगतो ना
आता माझ्याच सीमा
क्षितिजास लांघतो ना
मी क्षितिजास लांघतो ना

दि.१५/०५/२०२५
रात्री ११.५८ वा.



## (४२)
## सांगा गुलाबवेड्या

सांगा गुलाबवेड्या
माझ्या मनास थोडे
काट्याविना कसे हे
उलगडून जा कोडे

कवळ्या ज्या पाकळ्या ह्या
दुःखास झेलतात
काट्यांवरी स्वतःला
त्या नित्य पेलतात

का तू उदास होतो
जर बोचतात शल्ये
खरबर हा मार्ग चालून
मग दिसती ही साफल्ये

येतील ऋतू घेऊन
पर्णावली नव्याने
अन झडती पानगळीची
ओसाडशा मनाने

हसरे जरी मुखवटे
हृदयात काही काटे
उजळून आसमंत
तम कोपऱ्यात दाटे

दि.१८/०५/२०२५
रात्री ११.४८ वा.



## (४३)
## मनात माझ्या स्वप्नपालखी

हवा गारवी शिरशिर शिरवी
ओल्या धुक्याची ओल नवी
इथे एकटी गीत तुझे मी
ऐकताच उमले पालवी

सूर तुझे उमटून खोलवर
झाकझाकले नयन कधी
गीत गोडवा ओठी अडला
झरते अमृतमयी नदी

प्रीत वाढते गोडी चढते
आयुष्याची साथ अशी
धुंद धुंदते सखी प्रिया तव
विसरून जाते स्वत्व कशी

अशी सांज मग मनात येते
जरा टेकण्या निवांतता
अलगुज देते सांगून वेडी
मंद रातराणी शांतता

ये ये राजा क्षणात येथे
तुझी रागिणी वाट बघे
मनात माझ्या स्वप्नपालखी
सजुनी धजुनी रोज निघे

दि.२५/०५/२०२५
रात्री ०९.४४ वा.



## (४४)
## बेभान नको होऊस तू फार

किती कोसळशील धोधो करुनी
उसंत नको का तुला कधी
बोल पावसा टप टप वेड्या
झाले काय तुज सांग आधी

घेऊन येशी धारधारुल्या
अवनीवरती शिंपडण्या
जोर जरासा कमी असे तर
मिळेल फुरसत दव घडण्या

स्वच्छ न्हाऊनी धरा शोभली
तुझ्याच जलबिंदूंची कथा
अत्तर वाटे मृण्मयी धरणी
प्रीत दरवळे तिची तथा

तू येशी अन हिरवाईचे
कोंब उगवती नवे जरा
मनात टवटव आशा हिरव्या
ऋतू वर्षावाचाच खरा

प्रेम तुझे हे झेलून घेईल
वसुंधरा ही नाजुक नार
सहजी सुंदर तुला पेलण्या
बेभान नको होऊस तू फार

दि.२६/०५/२०२५
सकाळी ०६.५४ वा.




## (४५)
## पाऊसधारा ओलित वारा

पाऊसधारा ओलित वारा
गंध मातीचा दरवळतो
जलधारांनी आस बरसावीत
पाऊस मजसी का छळतो

पानेपाने दवात भिजती
तरारून उठते माती
आकाशाशी धरतीवरूनी
ओलाव्याची ही नाती

जसा वेडावून बरसून जातो
तसे भेटावे वाटे कुणी
ओल्या मिठीच्या खुणाही ओल्या
ओल्या भावनांना वेचुनी

मनात नाचून जातो मोरही
फुलती पिसारे रंगाचे
पाऊस येता मन बागडते
शहारलेल्या अंगाचे

तुझ्या धारेतून तुझ्या थेंबातून
मोहरून मन बावरते
तुझे बरसणे देई दिलासे
तप्त झळांतून सावरते

दि.२७/०५/२०२५
सकाळी ०९.०२ वा.



**(४६)**

**स्मृती ओलसर उरते ही**

थेंब जळाचा मोती टपोरा
फळावरी जो आहे थवकला
गळण्याआधी ढळण्याआधी
पाहे मिळविण्या जीव चिमुकला


येते वर्षा घेऊन हर्षा
ओल्या स्पर्शा गंध असे
जीव नव्याने जगण्यासाठी
धडपड सृष्टीचीच दिसे

पानापानावरून चालते
थंडाईची नवलाई
घरट्यामध्ये पिल्लं नाचती
छत्र पंखाचे धरे आई

ऊब जराशी हवी वाटते
आपुलकीची जवळीकता
वर्षावाने जलधारांच्या
रटाळ जीवनी आगळीकता

थांबून जाती वाटसरू अन
वाट मोकळी ठरते ही
पाऊस येतो जातो आणिक
स्मृती ओलसर उरते ही

दि.३०/०५/२०२५
सायं. ०७.०४ वा.



## (४७)
## असे असावे जीवन टवटव

हसऱ्या हसऱ्या
उमलउमलल्या पाकळ्या
या कमलिनी कळ्या
रोज सकाळी दवबिंदूंच्या
खुलती गोजिऱ्या खळ्या

रंग गुलाबी लक्ष्मी आसन
ऐश्वर्याची खूण
ऋतू जणू उमलतो फुलातून
वसंत ये दाटून

सरोवराची शोभा कमळं
रंग कमळ शोभा
स्पर्श मुलायम तनु रेशमी
प्रसन्न की आभा

कवितेतल्या उपमांची ही
दिव्य पुराणी खाणी
राजीवलोचन कमलनयन नि
मुखकमळांची कहाणी

असे असावे जीवन टवटव
उत्फुल्ल नि हासरे
सदा घडू दे कमल सुमन हे
कमलेचा वास रे
तुझ्यासवे कमलेचा वास रे

दि.३१/०५/२०२५
दुपारी ०४.२० वा.



## (४८)
## ऋणानुबंधांचे बंध अगणित

ऋतू अंगावर बहारलेले
नभ मेघांनी भरून गेले
धरणीवरती आकाशाचे
नाते आगळे उरून गेले

फुलती पाने फुले डोलती
कोंब कुशीतून हळू बोलती
आज इथे हे भविष्य उमलून
आनंदाला क्षण हे तोलती

हिरवी हिरवी तृणे खेळकर
स्पर्श रेशमी रुळे अंगावर
कळ्या लाडूल्या गोड गोजिऱ्या
किती भाळावे मधु रंगावर

कोण कुणाची वाट पाहते
कोण इथे मग रमून राहते
कुणास लगे ओढ अनोखी
कोण कुणावर जीव वाहते

कसे हे जुळते नाते अनामिक
ऋणानुबंधांचे बंध अगणित
मनास सांगा कसे बांधावे
जगा भरभरून जीवन क्षणिक

दि.०६/०६/२०२५
रात्री ११.३८ वा.



## (४९)
## **किती पावसाळे हे यावे**

पाऊस आला घेऊन ओला
सुगंध दरवळणारा
मनात नाचे मोर फुलोरा
मोद हा सळसळणारा

घे पानांची छत्री हिरवी
बरव्या पाऊसधारा
सांग सखे चल घेऊ आडोसा
प्रीत वर्षाव सारा

जलबिंदूची सरगम ऐकून
गीत मल्हार गाऊ
तुला हवे तर राणी माझी
चिंब वर्षावी न्हाऊ

चोचीमध्ये थेंब गारवे
मस्त तुषार उडावे
पावसात ह्या आनंदाचे
मेघ बरसू पडावे

सोबत बसुनी धुंदीमध्ये
स्वप्नं घरटे विणावे
किती पावसाळे हे यावे
नाते रुजुनी जावे

दि.०७/०६/२०२५
रात्री ११.५३ वा.



## (५०)
## इथे फिरस्ती कितीतरी

भूल पडते मनास माझ्या
कुठे कोणत्या जगात मी
मार्ग चालते नवे नव्याने
आणि माझ्या संगतीस मी

नव्याच इथल्या रोज सकाळी
नव्या उषेच्या नव्या खुणा
नव्या जगातील नवीच स्वप्ने
नव्या निशेला पडती पुन्हा

निशा कोणत्या जरा उशिरा
क्षितिजावरती पेंगुळल्या
प्रभातवेळी खुणा निशेच्या
उषेसाठी का रेंगुळल्या

थंडी इथली बंड पुकारे
उन्हात उडती मोद फवारे
कुठे उन्हाच्या झळा बोचती
कुठे उन्हाचे उष्ण तुषारे

मस्त धुंदीतुन रस्ते इथले
तारुण्याच्या मदात बुडती
काळ्या गोऱ्या आणि सावळ्या
सौंदर्याच्या पतंगी उडती

स्वतःत रमल्या जगात फिरती
इथे फिरस्ती कितीतरी
पुन्हा नव्याने जुन्या जगातच
जाण्यासाठी कधीतरी

दि.२४/०६/२०२५
रात्री ०८.३९ वा.



## (५१)
## आषाढातील पाऊसधारा

आषाढातील पाऊसधारा
मेघमाळ तोरणे अंबरा
झरझरणाऱ्या सरीसरीतून
एक प्रीतीचा वाहतो झरा

मधेच पडते ऊन चमकते
आणिक मध्ये तेज दमकते
आता वाटते गेला पाऊस
टपटप थेंब नर्तकी ठुमकते

इकडे वर्षा तिकडे उन्हाच्या
खेळ सोंगट्या सारीपाटाच्या
मग डोकावे इंद्रधनू अन
कळ्या फुलाव्या मनरंगाच्या

सांग सांगतो मास मनीचा
दूत हो सख्या मेघा सखीचा
दे संदेशा व्याकुळ गाथा
भाव जाण तू माझ्या मनीचा

अंगावरती येतो शहारा
श्रावणदारीऽऽ आषाढ पहारा
तप्त मनाच्या भूमीवरती
आषाढच हो नित्य उतारा

दि.०७/०७/२०२५
रात्री ११.४७ वा.

## (५२)
## सुख असे का वागते

ओंजळभर सुखासाठी
जीव गहाणेला
काऽऽय उपयोग
सागराचा तहानेला

जन्म जातो शोधण्याला
सुखाची तिरीप
दुःखाचंच तन वाढं
रब्बी वा खरीप

चांदण्याची भूल असे
हूल सुख देते
किती काही बदल्यात
सुख हो मागते

पावसाची सर हवी?
आधी ग्रीष्मी चटके
मोदभरे क्षण हवे?
खिन्न काळाचे फटके

मागे पळताना
हाती  कधी ना लागते
कधीच कळे ना
सुख असे का वागते

दि.१३/०७/२०२५
सायं ०५.५४ वा.

## (५३)
## जगणं म्हणजे काय ?

जगणं म्हणजे काय ?
रोज उत्साहाला नवे पाय
मरगळ झटकून उगवू आपण
अंधाराचे कसले काय

जगणं म्हणजे काय ?
नवा दिवस नवा गाव
रोज नव्यानेच आपुल्या
काळजाचा घेणे ठाव

जगणं म्हणजे काय ?
मुखी हासू दडवू घाव
जगण्याच्या मैदानात
जिंकायाचा डाव

जगणं म्हणजे काय ?
क्षमा करण्याचे नाव
मनामध्ये जपू सारे
कोमलसे भाव

जगणं म्हणजे काय ?
बीज कोंब होत जाय
शिशिराच्या आघातांवर
वसंताचा कोमल पाय

दि.१८/०७/२०२५
रात्री ११.०९ वा.



## (५४)
## तू अशी सुंदरी मनु मंजिरी

तू अशी सुंदरी मनु मंजिरी
रेखीव कलाकृती
ईश्वर सांगू पाहे ऐसी
ललनेची संस्कृती

मनात माझ्या उमलून देशी
मदनरती गोजिरी
मोरपिशी मोहरे भावना
प्रिया अशी साजिरी

तुझ्या केशकुंतली रुळे जो
सुगंधाळला गजरा
खिळून राहती तुझ्यावरी बघ
वेडावून गे नजरा

वसन रेशमी अंगावरती
खुलवीत जा सौंदर्या
उसळून लाटा भरती येई
उधाणलेल्या दर्या

अंगोपांगी बहरून आले
ऋतू सोहळे सारे
तुझ्याच कस्तुरगंधी वेडे
होत वाहती वारे

पहा एकदा मृगनयनी हे
कटाक्ष पडू दे मोहक
जगणे होईल सार्थक माझे
स्वप्न सत्य आरोहक

दि.१९/०७/२०२५
रात्री ०९.०४ वा.

## (५५)
## मनी श्रावण हा राही

श्रावणातल्या उन्हाचा
थाट कुणी हो सांगावा
लपाछपी डाव चाले
आलो म्हणून कांगावा

आले वाटते झणीच
होते गुडूप ढगात
सरी पावसाच्या येती
आनंदून या जगात

बरसता धार ओली
ऊब उन्हेरी देते ना
आस श्रावणी मनात
जागा जिव्हाळी घेते ना

सार जीवनाचे जणू
खेळ क्षणाचाच सारा
आता पडे ऊन आता
सरीवर झुले वारा

सारे दिसते नि जाते
असते नसते काही
सारे सोडुनिया द्यावे
मनी श्रावण हा राही

दि.२१/०७/२०२५
रात्री ११.२९ वा.



## (५६)
## बहर होत जोजवणे

फुलाफुलांच्या राज्यामध्ये
गंध मळे पसरले
मनामनातील भाव मल्मली
पाकळीत विसरले


हसणे केवळ हसणे माहीत
पुष्प रुदन घडते का
उधाण वारे वादळ वर्षा
दुःख ते सापडते का

आत वेगळे हर्ष धुमारे
परागकण असताना
कशास चिंता नवं घडण्याची
जन्म मुठीत वसताना

रंग निराळे स्पर्श आगळे
छंद सुमन मन वेडे
हळुवार सांगते कुसुम कळीतून
स्वप्नं रोज मज छेडे

रोज उमलते कलिका जीवनी
रोज वेगळे जगणे
म्हणून म्हणते ऋतू ऋतूंना
बहर होत जोजवणे

दि.०२/०८/२०२५
दुपारी ०४.४९ वा.



## (५७)
## तू वसंत जीवनी असूनही

अपराध न कळता घडला हा
मी तुला दुखावून गेलो
जीवनात आली तू माझ्या
मी स्वतः सुखावून गेलो

असे कसे मी वागून जातो
मला कळतंच नाही ग
मी ठरवतो तरी कसे
काही नेमके राही ग

तू वसंत जीवनी असूनही
मी शिशिर गळती तुज देतो ना
कारण नसता तुझा दुरावा
ओढवून मी घेतो ना

तू उदास होऊन बसते आणिक
मन माझे ना लागे कुठे
कळले आता तुझ्याविना हे
जीवन निष्फळ रोज  इथे

सोड सखे मज करी क्षमा तू
पुन्हा असे न मी वागेन
जसा सखा तुझ्या मानसीतला
निश्चित तुजला लाभेन

दि.१०/०८/२०२५
रात्री १०.४३ ,वा.



## (५८)
## नवीन वाटे चंद्रमा

नवीन वाटे चंद्रमा
नवी नवीच पौर्णिमा
नव्या ऋतूत सांगते
तुला प्रिया ही उर्णिमा

नवीच रात वाटते
नवी सखी ही भेटते
नवीन ज्वाल मन्मनी
नवीन स्पर्षे पेटते

नवीच जादू फेकते
शीत किरण सुंदरी
नव्या जगात डोलते
नवी दिशा का अंबरी

नवीन पाझरे पहा
अमृताचे चांदणे
दैवी लेणे प्रीतीचे
चांदणीचे सांगणे

नव्याच राज्यडंबरी
स्वप्न देखणे फुले
एक चंद्रमा मनी
रोज प्रियवरा डुले

दि.१२/०८ /२०२५
रात्री १०.४० वा.



## (५९)
## पागोळ्यांचा नाद झरे

पागोळ्यांचा नाद झरे....
झरझर झरझर धार सरे
आठवणींच्या हिंदोळ्यावर
जीवन भासे रम्य खरे

पागोळ्यांचा नाद झरे......
तू येशील का सांग बरे
काळ्या मेघांतून सापडे
प्रथम भेट मल्हार ठरे


पागोळ्यांचा नाद झरे......
मिठी ओलसर गंध उरे
फुलात मिटल्या भावभावना
हळूच दरवळती अत्तरे

पागोळ्यांचा नाद झरे......
दाही दिशी सौरभ पसरे
मृद्गंधाच्या ओढीपोटी
स्वर्ग भूवरी हा उतरे

पागोळ्यांचा नाद झरे......
ताप कोणता मन विसरे
श्रावणसरीत तनु तरतरीत
गीत अधरी उमले हसरे

पागोळ्यांचा नाद झरे......
पागोळ्यांचा नाद झरे......

दि.१३/०८/२०२५
रात्री ११.४८ वा.



**(६०)**

**मारू नको शर तू मदना रे**

मारू नको शर तू मदना रे
सर सर मेघा आडून
दे सजनाला संगती माझ्या
सत्वर वेड्या धाडून

भिजले तनमन भिजला कणकण
रती देही हो उन्मन
भेट घडवुनी जरा होऊ दे
धुंद आमुचे मीलन

सहस्र कलिका उमलून येती
जणु एक समयाला
तो असला तर सोसून घेईन
तुझा मधुर प्रीत घाला

भिजल्या केसातून केवडा
उगाच का दरवळतो
ऋतू वर्षावी शीतल स्पर्शे
विरही जना तू छळतो

म्हणून म्हणते शर बरसू दे
सोबती राजस असता
उगाच मदनानले जाळीशी
काळजास मज नसता

दि.२२/०८/२०२५
रतेय ११.३९ वा.



## (६१)
## आता पुन्हा नव्याने

आता पुन्हा नव्याने
मी पाते गवती व्हावे
अन उंच उंच गगनी
स्वप्नात झुलण्या जावे


आता पुन्हा नव्याने
मी धरतीवर झोपावे
सुकलो जरी जरासा
पक्षिणी जीवा खोपावे

आता पुन्हा नव्याने
ऋतुगंध पीत जावे
वाऱ्यासवे मी शीतल
स्वर धुंद गाण गावे

आता पुन्हा नव्याने
दुर्वांची जुडी व्हावे
मस्तकी श्रीगणेशाच्या
मज भक्तिभावे वहावे

आता पुन्हा नव्याने
तुज एक मागणे रे
दे एकदा नशिबी
असे झाड बनून जगणे रे

दि.११/०९/२०२५
रात्री ११.४३ वा.



## (६२)
## सजण्या सजती फुलवंती

सुकला गजरा जरी वेणीतच
गंध तयाचा विरेल का
ऋतू हवासा मधुमासाचा
पुन्हा माघारी फिरेल का

रोज उमलू दे कळ्या मोगरी
रोज जाईची रम्य फुले
जुई हासू दे वेलीवरती
कुठे अबोली मौन डुले

काट्यामधली कोरांटी अन
बकुळी उंचशा झाडाशी
गंध केवडा वेडा केवढा
मरवा दरवळ हाराशी

मधूमालती सुवर्णचंपा
गुलाब आणिक शेवंती
कुंदकळ्यांच्या धुंद पांढऱ्या
पुष्पवल्ली हो त्या फुलती

सजती फुलवंती
सजण्या सजती फुलवंती

दि.२४/०९/२०२५
रात्री १०.३९ वा.

## (६३)
## बहरली वेल नात्यांची

बहरली वेल नात्यांची
ती गगनावरती चढली की
धरुनी हात हातात
मृण्मयी होत गढली की


मुळांनी घट्ट थांबावे
जरा मातीत लपताना
कोंब येतील जोर धरतील
वादळातून जपताना

राहुनी पाठीशी त्यांना
कितीदा बळ द्यावे केवढे
तरीही अलगद दूर व्हावे
रसाशी देऊनी तेवढे

अपेक्षा का करावी की
फुले फळणार ती मजला
ऋतूंच्या भाग्यरेखेने
वेलु डुलणार की चंचला

करुनी कर्तव्ये निज सारी
तिला आधार मग द्यावा
उडू द्यावे तिज वाऱ्याशी
मोद मग त्यातची घ्यावा

दि.३०/०९/२०२५
रात्री १०.३२ वा.



## (६४)
## छेड तू तराणे राजा

छेड तू तराणे राजा
वसंतातल्या बहराचे
तारुण्याच्या उंबरठ्यावर
भाव भरतीला कहराचे

उमलून आल्या यौवनात या
प्रीत कळ्यांच्या बघ डाल्या
फुलाफुलांवर भृंग कामिन्या
मधु प्राशना बघ आल्या

नजर शोधते तुला तुला
नि फक्त तुला रे माझ्या प्रिया
कुठे कुठे नि कुठे कसे रे
शोधु तुला मी सांग प्रिया

न लागे कुठेही मन बावरे हे
वेडे उगाची का मारे फेरे
कोठून येतो आवाज तोचि
शोधून येते किती योजने रे

बांधून ठेवावे वाटे या काळा
जपून ठेवावा मोहक चाळा
पवन वाहून स्पर्श करतो
हळूवारसा मम कपोला

दि ०४/१०/२०२५
रात्री १२.३२ वा.



## (६५)
## फुलासारखे फुलायचे की

फुलासारखे फुलायचे की
रोज नव्याने खुलायचे
रूपरसाळ्या सुगंध मोहक
कशाकशावर भुलायचे

कुणी सोबती असो की नसो
जन्म कशाला कळायचे
श्वासासंगे क्षणाक्षणाला
नवीन जगणे वळायचे

मार्ग एकला तरी न धाकला
दृष्टी भरून पहायचे
नव्या ऋतूंच्या नव्या जगाला
परिमळ हास्ये लिहायचे

माहीत असते सुकायचे परि
क्षणा आजच्या ना मुकायचे
सृष्टी ज्याने रेखीयली त्या
ईश्वरचरणी झुकायचे

दि.११/१०/२०२५
रात्री १२.३७ वा.



## (६६)
## ओल्या पंखांची झळाळी

थेंब थेंब बरसले
नभ असे गाभूळले
ढगाढगाशी सुरात
गाणे पावशी जुळले

ऋतू आधी एक होता
आता भरवसा गेला
शरदात चांदण्याला
पावसाने झोका दिला

हवा हिवाळी ओलेती
चिंब दिवाळी चालली
कुणी मंदाकिनी आता
वेळी अवेळी गाळली

वेडी वर्षाराणी अशी
कधी कधीही बरसे
जीव थांब म्हणूनिया
आता जगण्या तरसे

या रे या पिल्लांनो जवळी
मोजा पावसाच्या ओळी
पांघरून किती घ्यावी
ओल्या  पंखांची झळाळी

दि.१२/१०/२०२५
रात्री ११.४३ वा.

## (६७)
## सण भाऊबीज येतो

एका झाडावरूनी फुलणे
तरीही वेगळे जीवन
जसे कळ्यांचे तसेच आपुले
भावंडांचे मधुबन

मुळे सारखी घट्ट विचारी
तरी भिन्न डोलणे
वाचा शिक्षा जरी सारखी
तरी भिन्न बोलणे


ऋतू पाहिले किती सारखे
तरी स्मृती आगळ्या
प्रत्येकाच्या दैव परडीतील
भोग कळ्या वेगळ्या

जिथून निपजणे तिथून जाणे
दूर कुठेतरी रुजण्या
तरीही कोणते बंध सांधती
जिव्हाळ्यास सांगण्या

सहोदरे जरी असतील कुठेही
मूळ खुणावत राही
कुणा न कळणे ऐसे जुळती
ऋणानुबंध हो काही

भावंडांच्या प्रेमभराचा
सण भाऊबीज येतो
नव्या नव्याने या नात्याला
स्नेह परमतेस नेतो

दि.२३/१०/२०२५
रात्री १०.३८ वा .



## (६८)
## जगता जीवनगाणे

काय सांगणे असेल पहा न
सुंदर कुसुम लतांचे
कोण तयांना भेटत असतील
सोहळे कसे स्वागतांचे


अंगावरती लक्ष चांदण्या
सुगंध कुपी भरलेल्या
मदन बाण त्या अलगद त्यांनी
हृदय कळ्या चिरलेल्या

कुठून येतो गंधित होतो
पवन परिमळे नित्य
रुजणे वाढणे खुलणे फुलणे
सुकणे शाश्वत सत्य

ऋतुऋतूंच्या तऱ्हा आगळ्या
तरीही वेली सज्ज
जितके जीवन तितक्या बहरा
गळतीसही ती सुसज्ज

स्वतःस वाढवत पसरवणे अन
सौरभ देऊन जाणे
असेच यावे तुला मानवा
जगता जीवनगाणे

दि.२४/१०/२०२५
रात्री ११.५३ वा.




## (६९)
## जळते अजूनी पणती

आले पाहुणे गेले पाहुणे
आली दिवाळी गेली
वर्षभराच्या प्रतीक्षेतली
ठेव हृदयी ठेवली

कुणी ठरवले होते काही
ते ते सार्थक झाले
सुखा सुखांचे चिमणे दीपक
घरोघरी हो आले

शरद ऋतूची शीतल हलकी
चादर अंगावरती
अंधारातली तेज आरती
प्रकाशास ये भरती

नव्या नव्याने वस्त्र नेसले
नवीन आभूषण हे
घरादाराला वाटे दिवाळी
आनंदे भूषण हे

खुणा तियेच्या मनात अजूनी
जळते अजूनी पणती
एक दिवाळी सदा तेवते
मनात खरी मिणमिणती

दि.२६/१०/२०२५
रात्री ०९.२७ वा.

# लेखिकेचा परिचय

- **डॉ. मंजूषा पंढरीनाथ कुलकर्णी,**

  पीएच. डी. (संस्कृत), नेट (संस्कृत), सेट (शिक्षणशास्त्र), एम.ए. (संस्कृत), एम.एड., राजपत्रित अधिकारी वर्ग १ (महाराष्ट्र शासन, भारत) (सहाय्यक प्राध्यापक - संस्कृत)

  २३१ समर्थ अलंकार, सदनिका क्र. २, कवितांच्या बागेसमोर, विठ्ठल रुक्मिणी मंदिराजवळ, ज्योतीनगर, छ. संभाजीनगर - ४०० ००५

  ई-मेल : dr.manjushak@gmail.com

  मोबाइल : + ९१ ९८२२८ ३९४९१ । व्हाट्सएप; +९१ ९०८२१ ६१५२४

**सध्या :**

- **प्रशासकीय अधिकारी, मुख्यमंत्री कार्यालय, मंत्रालय, मुंबई (महाराष्ट्र)** येथे राजपत्रित अधिकारी वर्ग १ म्हणून कार्यरत.
- महाराष्ट्र लोकसेवा आयोगामध्ये राज्यात सर्वप्रथम स्थान अधिगत आणि राजपत्रित अधिकारी वर्ग १ शासनसेवेमध्ये २२ वर्षांपासून कार्यरत.
- **संस्कृत सल्लागार मंडळाची सदस्य, साहित्य अकादमी, नवी दिल्ली. (https://sahitya-akademi.gov.in)**
- व्यापकदृष्ट्या मान्यताप्राप्त संस्कृत भाषातज्ज्ञ, **साहित्य अकादमी अनुवाद पुरस्कार २०२० प्राप्त,** उच्च शिक्षणातील शैक्षणिक विचारवंत, उच्च प्रशंसित कवयित्री, लेखिका, संशोधक आणि वक्ता.
- तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी लिखित ''वैदिक साहित्याचा इतिहास'' (२६० पृष्ठे) या **मराठी पुस्तकाचा (साहित्य अकादमी पुरस्कृत) संस्कृतमध्ये अनुवाद करण्याचा विशेष प्रतिष्ठेचा प्रकल्प** साहित्य अकादमीने प्रदान केला होता, जो पूर्णत्वाला जाऊन साहित्य अकादमीद्वारे अनुवाद प्रकाशित.
- आचार्य बाळाराव **सावरकर लिखित स्वातंत्र्यवीर सावरकर यांच्या चरित्राच्या (अंदाजे २००० पृष्ठांच्या) ४ खंडांचा अत्यंत सन्मानाचा संस्कृत अनुवाद प्रकल्प** स्वातंत्र्यवीर सावरकर राष्ट्रीय स्मारक, मुंबई यांनी स्वाधीन केला आहे. त्यापैकी प्रथम खंडाचा अनुवाद पूर्ण झालेला असून प्रकाशनाच्या मार्गावर.

- गेल्या २५ वर्षांपासून, भाषा, साहित्य, संस्कृती, कला, नाटक, शिक्षण आणि भाषेशी संबंधित विधायक कार्याचा प्रसार करण्याच्या ध्येयाने प्रेरित अन् कार्यरत आहे.
- संस्कृतच्या प्राध्यापिका, वसंतराव नाईक शासकीय कला आणि सामाजिक शिक्षण संस्था, नागपूर.
- **महाराष्ट्र शासनाच्या पहिल्या पूर्णवेळ महिला भाषा संचालक आणि महाराष्ट्र राज्य बाल हक्क संरक्षण आयोग, महाराष्ट्र शासनमध्ये प्रशासकीय अधिकारी** ह्या पदांवर कार्यभार सांभाळला.
- पुणे विद्यापीठातून पदवी आणि पदव्युत्तर शिक्षण पूर्ण केले
- तसेच पुण्यातील एसएनडीटी विद्यापीठामधून देखील बी.एड. आणि एम.एड. पूर्ण केले.
- एकाच वेळी पुणे विद्यापीठ आणि टिळक महाराष्ट्र विद्यापीठात अव्वल येण्याचा बहुमान मिळवला.
- MPSC वर्ग-एक परीक्षेमध्ये संस्कृत या विषयामध्ये सर्वप्रथम येण्याचा बहुमान
- विविध राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय परिषदा, चर्चासत्रे आणि परिसंवादांमध्ये अनेक शैक्षणिक शोधनिबंध सादर केले आणि अनेक प्रतिष्ठित पुरस्कार जिंकले.

**लक्षणीय योगदान :**

डॉ. मंजूषा या भाषा, कला, नाटक, संस्कृती, प्रशासन, साहित्य आणि शिक्षण या क्षेत्रांमध्ये अनेक बहुमुखी भूमिकांमध्ये योगदान देत आहेत. त्या संस्कृतमधील एक प्रसिद्ध प्राध्यापिका, एक प्रसिद्ध वक्ता, एक विचारशील प्रवचनकार, एक वाचक, एक उद्घोषक, एकल-कलाकार-नाट्यकलावंत/सादरकर्त्या, एक कवयित्री, एक संशोधक, एक लेखिका आणि अशा अनेक क्षेत्रांमध्ये नैपुण्य असलेल्या विदुषी आहेत.

गेल्या काही वर्षांमध्ये डॉ. मंजूषा यांनी भाषिक संशोधन, अनुवाद, भाषा आणि कोशविकास आणि भाषा धोरणाची निर्मिती अशा अनेक महत्त्वपूर्ण क्रियाकार्यांचे नेतृत्व केले आहे. शिक्षण, साहित्य, प्रशासन आणि संस्कृती या

क्षेत्रातील त्यांच्या अद्भुत योगदानाबद्दल त्यांना अनेक पुरस्कार आणि सन्मानचिन्हांनी सन्मानित करण्यात आले आहे.

डॉ. मंजूषा यांनी मराठी कवितेच्या क्षेत्रात जागतिक स्तरावर विश्वविक्रमधारक अशी एक अनोखी ओळख निर्माण केली आहे आणि चरित्र, कविता, ललित आणि तात्त्विक तसेच वैचारिक लेखन अशा सर्व संबंधित शैलींमध्ये त्या एक उत्कृष्ट आणि प्रथितयश लेखिका म्हणून चमकत आहेत.

**प्रकाशमार्गा:** हे पुस्तक डॉ. प्रकाश बाबा आमटे यांच्या चरित्राचा (मराठी भाषेतील) डॉ. मंजूषा यांनी केलेला संस्कृत अनुवाद आहे ज्याला २०२० वर्षातील साहित्य अकादमीच्या अनुवाद पुरस्काराने गौरविले गेले. डॉ. आमटे यांच्या या अद्भुत जीवनप्रवासाचा संस्कृतमध्ये अनुवाद करण्यात डॉ. मंजूषा यशस्वी ठरल्या आहेत.

''**साहित्यिक व्रत**'' म्हणून गेल्या ६ वर्षांपासून, डॉ. मंजूषा रोज काव्यरचना रचत आहेत आणि प्रसारित करत आहेत. त्यानिमित्ताने मराठी कवितेतील 'हाय रेंज बुक ऑफ वर्ल्ड रेकॉर्ड' मध्ये जागतिक विक्रम केल्याबद्दल महाराष्ट्राचे माजी राज्यपाल श्री. भगतसिंग कोश्यारी जी यांच्या हस्ते डॉ. मंजूषा यांचा सत्कार झाला आहे.

**प्रकाशित पुस्तके –**

- डॉ. मंजूषा यांनी मराठी, संस्कृत आणि इतर भाषांमध्ये अनेक उत्तम पुस्तके लिहिली आहेत आणि त्यांचे पहिले पुस्तक 'विवाह संस्कार' २०१० या वर्षी प्रकाशित झाले. त्यानंतर डॉ. मंजूषा यांनी संस्कृतमधील इतर अनेक पुस्तके प्रकाशित केली आहेत ज्यामध्ये श्यामस्य माता, विवेकानंदस्य विचारसौंदर्यम्, वेदकालीन स्त्रीरत्नानि, स्मृतिवचनानि, स्मृतिप्रतिपादित न्याय:, विवेकरत्नानि, प्रकाशमार्गा : अशी अनेक पुस्तके संस्कृतमध्ये रचली व अनुवादित केलेली आहेत. तर 'प्राचीन भारतीय समाज', 'सूर्य शक्ती और मानव', 'कौटिलीय अर्थशास्त्र', 'स्मृतीग्रंथ – भाग १ और २' ही त्यांची हिंदी भाषेतील पाच पुस्तके प्रकाशित झाली आहेत.

  त्यांच्या मराठीतील पुस्तकांमध्ये अनमोल विचार ठेवा – नचिकेता (लेखांचा संग्रह), लावण्यखणी (मराठी लावणी गाण्यांचा संग्रह), कणखरबाणा राणी

अहिल्या (अहिल्याबाई होळकर यांचे चरित्र), मृद्‌गंध (ग्रामीण मराठी भाषेतील कवितांचा संग्रह), एक पाती गवताची (ललित लेखसंग्रह), प्रीतसुधा, आरसपाणी-जीवनगाणी (मानवी जीवनावरील कवितांचा संग्रह), गोड-गोड पापा (बालकवितांचा संग्रह), सर्ग-निसर्ग, संतोष, उत्कर्ष, पूर्वा, सृष्टीगंध, युगंधरा (निसर्गावरील कविता), नाथा पंढरीनाथा, ईश भाग्येश (देवभक्तीपर), मंगेश, आंदण (प्रासंगिक), रूप-स्वरूप, श्रीरंग (राधाकृष्ण), अलवार, मधुश्री, सहा सोहळे (ऋतू), सुधांशु (चंद्र), दिव्यांतरी (सूर्य), बकुळफुले, अळुमाळु, सुरभी, कामिनी (फुलांवरील कविता), खाणाखुणा (पशु), वैष्णवी (पक्षी), नादश्रुती, श्वेता (तिच्यावरील प्रीत कविता), स्वामिनी (स्त्रीजीवन - भाग १), मृणालिनी (स्त्रीजीवन - भाग २), प्रमिला (धरती-आकाश), लाघव वेळा (सकाळ-संध्याकाळ), मनमंदिरा, तेजशलाका, उदय, मंजुभारती (जीवनपर कविता), प्रियतमा शुभांगी, नेहा, सुधीर (त्याच्यावरील प्रीत कविता), मन्मनी, इंदुमती, मंजुश्री, मानसी (ललितलेख), बोल बरवे, मनस्विनी, हृदयस्पर्शी (रसिक प्रतिक्रिया - कवीश्वर), प्रतिसाद, रसिकवरा, हृदयतरंग, अनुबंध (अन्य रसिक प्रतिक्रिया), गंधराणी (मिश्र कविता), श्रावणी (पाऊस कविता), उल्का (गझल), तेंव्हा (वेळा), नभ मोजताना (धरती-आकाश), जरा रेंगाळले (वाट), रंगतनु (रंग), यांचा समावेश आहे.

याशिवाय विज्ञानातील संस्कृत, स्मृती धारा भाग-१ आणि भाग २, चतुरंग, शोधामृत, संस्कृत मराठी उखाणे, गौरवगाथा सूर्याची, जीवनचिंतन, भावमंजूषा, विचारकणिका, वेदकालीन स्त्रीरत्ने आणि अणुविज्ञानातील झंझावात - डॉ. अनिल काकोडकर, प्राचीन भारतीय समाज. ही पुस्तके देखील प्रकाशित आहेत. त्यांचे मराठीमध्ये 'मंजु मंजिरी' आणि 'सर्ग निसर्ग' नावाने ऑडिओ कवितासंग्रहही प्रकाशित झालेले आहेत.

**प्रकाशनाच्या वाटेवरील पुस्तके -**

(मिश्र कविता) - कवडसा, मृण्मयी, अबोली, (रंग) - कृष्णकांत, (सर्वोत्कृष्ट कविता) - माझी कविता.

**मिळालेले पुरस्कार :**

**पुरस्काराचे नाव आणि वर्ष –**

- कोकण मराठी साहित्य परिषदेचा अत्यंत मानाचा २०२२–२३ चा ललित गद्य विभागातील द्वितीय क्रमांकाचा सौ. लक्ष्मीबाई व राजाभाऊ गवांदे पुरस्कार 'एक पाती गवताची' या ललितलेखसंग्रहास प्राप्त झाला आहे.
- शिक्षाश्री सन्मान – २०२४
- स्व. वा.ना. उत्पात स्मृती पुरस्कार – २०२३
- परळी भूषण पुरस्कार २०२३
- मुंबई मराठी ग्रंथ संग्रहालय २०२३ पुरस्कार (गौरव गाथा सूर्याची साठी)
- संस्कृत भाषा सभा नाशिक, महाराष्ट्र तर्फे डॉ. व्ही. एम. गोगटे स्मृती पुरस्कार २०२३
- अखिल ब्राह्मण मध्यवर्ती संस्था, नाशिक २०२२ तर्फे सन्मान आणि सत्कार
- अखिल देशस्थ ऋग्वेदी ब्राह्मण मध्यवर्ती मंडळ, वडोदरा तर्फे ''साहित्य रत्न'' पुरस्कार २०२२
- सरस्वतीदेवी विद्या विकास ट्रस्ट पुरस्कार २०२२
- प्रेमचंद सन्मान २०२२
- अणुविज्ञानातील झंझावात : डॉ. अनिल काकोडकर – ३ राज्यस्तरीय पुरस्कार प्राप्त
- महात्मा फुले राज्यस्तरीय बाल–साहित्य पुरस्कार (महाराष्ट्र साहित्य प्रतिष्ठान) २०२१
- राज्यस्तरीय संत नामदेव चरित्र साहित्य पुरस्कार २०२०
- लेखक सुनील रंगराव देसाई राज्यस्तरीय बाल–साहित्य पुरस्कार २०१९
- संस्कृतसाठी साहित्य अकादमी अनुवाद पुरस्कार २०२०
- राष्ट्रपती पुरस्कार विजेते दिवंगत व्ही.डी. सर्जे गुरुजी प्रतिष्ठानचा जीवन गौरव पुरस्कार २०१८

- पत्रकार उत्कर्ष समिती (मुंबई)चा राज्यस्तरिय आदर्श शिक्षक पुरस्कार २०२७
- शेतकरी शिक्षण प्रसारक मंडळ आष्टी जि. बीड (महाराष्ट्र) चा राज्यस्तरीय आदर्श पुरस्कार
- द्वारका प्रतिष्ठानचा राज्यस्तरीय सर्वोत्कृष्ट प्रशासक पुरस्कार
- गोस्वामी संत तुलसीदासकृत रामचरित मानस पुरस्कार २०२६
- राज्यस्तरीय दैनिक भास्कर महिला पुरस्कार २०१२
- राज्यस्तरीय लोकमत सखी सम्राज्ञी पुरस्कार २०१२
- दिल्ली संस्कृत अकादमी, अखिल भारतीय-नवोदित - संस्कृत कवि प्रतियोगिता पुरस्कार २०१२
- लोकमत माझी आई पुरस्कार २०१२
- राज्यस्तरीय महिला गौरव पुरस्कार २०११
- संस्कृत नाट्य महोत्सव - संहितालेखन प्रथम पारितोषिक २०११
- संस्कृत नाट्य महोत्सव - नाट्य द्वितीय पारितोषिक २०११
- राज्यस्तरीय विद्यारत्न पुरस्कार २०११
- राज्यस्तरीय विद्यारत्न पुरस्कार २०१०
- S.N.D.T. महिला विद्यापीठ, सर्वतृतीया २००१
- मध्यप्रदेश संस्कृत अकादमी राष्ट्रीय निबंध रचना पुरस्कार १९९८
- महाराष्ट्र राज्यशासन संस्कृत प्राविण्य पुरस्कार १९९८

- **Digital Content :**

| अ.क्र. | तपशील | लिंक |
|---|---|---|
| १ | सखी सह्याद्री मुलाखत, दि. १०-१०-२०२४ | https://www.facebook.com/share/v/FmEuAjAVeKGrunYB/?mibextid=WC7FNe |
| २ | सोनाली नवांगुळ, डॉ. मंजूषा कुलकर्णी यांना साहित्य अकादमीचा अनुवादासाठी पुरस्कार | https://www.loksatta.com/pune-news/sonali-nawangul-dr-manjusha-ku-lakarni-sahitya-akademi-award-for-translation-akp-94- 2600116 ?utm_source =whatsapp_web & utm_medium =social& utm_campaign=socialsharebuttons |
| ३ | "आपल्यालाच आपला प्रकाश होता आलं पाहिजे." साहित्य अकादमीचा पुरस्कार मिळाल्या नंतर मंजुश्री यांनी दिलेला हा संदेश आपल्या सर्वांसाठी साहित्य अकादमी पुरस्कार विजेत्या डॉ. मंजूषा कुलकर्णी MaxWoman वर. | https://youtu.be/Lqu-YF4G-rw |
| ४ | डॉ. मंजूषा कुलकर्णी यांना साहित्य अकादमी पुरस्कार | https://www.madhyamvruttseva.com/डॉ-मंजूषा-कुलकर्णी-यांचा/ |

| | | |
|---|---|---|
| ५ | महाराष्ट्राचे माननीय<br>राज्यपाल यांचे ट्वीट | <https://twitter.com/mah<br>a_governor/status/<br>@maha_governor<br>1439559856764030979<br>?s=08<br><https://twitter.com/mah<br>a_governor/status/143955<br>9859536482304?s=08 |
| ६ | संस्कृत भाषाव्रताचा सन्मान<br>‘प्रकाशवाटा’ या डॉ. प्रकाश<br>आमटे यांच्या आत्मचरित्राचा<br>संस्कृत अनुवाद<br>डॉ. कुलकर्णी<br>यांनी ‘प्रकाशमार्गा:’ | https://www.loksatta.com<br>//lokrang/sahitya-<br>akademi-award-for-<br>translation-autobiography-<br>of-prakash-<br>amte-poet-prof-dr-<br>manjusha-kulkarni-<br>prakashwata-zws-<br>70-2612674/lite/<br>?utm_source=whatsapp_<br>web&utm_medium=social&<br>utm_campaign=socials<br>harebuttons |
| ७ | https://mr.wikipedi<br>a.org | https://mr.wikipedia.org/<br>wiki/मंजूषा_कुलकर्णी |
| ८ | प्रा.डॉ. मंजूषा कुलकर्णी<br>यांचा महाराष्ट्र राज्याच्या<br>मा. राज्यपालांच्या हस्ते<br>अभिनव साहित्यिक विक्रम<br>केल्याबद्दल सत्कार | https://youtu.be/<br>6x7BRzz_seo |

| | | |
|---|---|---|
| ९ | प्रशासक आणि संस्कृत विद्वान - डॉ. मंजूषा कुलकर्णी यांच्याशी भेट (डीडी न्यूजद्वारे) | https://youtu.be/<br>7a5dNUZKnRk |
| १० | @MahaGovtMic | https://twitter.com<br>MahaGovtMic/status<br>1476551366352924<br>672?s=08 |
| ११ | कवयित्री डॉ.मंजूषा कुलकर्णी यांचा जागतिक काव्य विक्रम केल्याबद्दल राज्यपालांच्या हस्ते सत्कार 'साहित्यिक व संतांनी देश एकसूत्रात बांधला' भगतसिंह कोश्यारी | https://twitter.com/<br>InfoVidarbha/status/<br>1418559733921816<br>580?s=20 |
| १२ | साहित्याच्या पारावर<br>डॉ. मंजूषा कुलकर्णी<br>सखी सह्याद्री - डीडी<br>सह्याद्री दूरदर्शन मुंबई | https://youtu.be/<br>VEJcY4GX7tg |
| १३ | सखी सह्याद्री | <https://youtu.be/IT<br>LxInwuJc ; https:/<br>youtu.be/7a5dNUZKnRk |
| १४ | खास कार्यक्रम / नवदुर्गासह डॉ.मंजूषा कुलकर्णी / नवरात्री स्पेशल / सकाळ मीडिया | https://youtu.be/<br>m1Ot_LzxI4k |

| | | |
|---|---|---|
| १५ | मनीषा नवपुते यांची<br>फेसबुक पोस्ट | https://m.facebook.com/<br>story.php?story_fbid=1266<br>533350529198id=10001517<br>6343763&sfnsn=wiwspwa |
| १६ | संजीव खानझोडे यांची<br>फेसबुक पोस्ट | https://m.facebook.com/<br>story.php?story_fbid=<br>4429100480484776<br>id=100001546044035<br>sfnsn=wiwspwa |
| १७ | ऑडिओ अल्बम –<br>"सर्ग_निसर्ग" ऑडिओ<br>अल्बम – "मंजुमंजिरी" | <https://vy6s8.app.goo.gl/<br>NKnJ><br>https://vy6s8.app.goo.gl<br>/A8Z5 |
| १८ | Special Screening of<br>100th Episode of<br>Mann Ki Baat from<br>Raj Bhavan | https://www.youtube.com<br>/live/7-dyWQaLA?si=mid<br>7qSf_HIM6WQ8q |
| १९ | स्वामी विवेकानंद<br>व्याख्यान : भाग – १ | https://youtu.be/TrNMBV_<br>ysf8?feature=shared |
| २० | स्वामी विवेकानंद<br>व्याख्यान : भाग –२ | https://youtu.be/NpvMk-<br>Pu4dOs?si=typfHtOvNg-<br>1hDXgT |

**सारांश :**

- एकूण अनुभव (शैक्षणिक) : २२ वर्षे
- एकूण अनुभव (प्रशासकीय) : १३ + वर्षे
- व्याख्याने आणि भाषणे : १००० पेक्षा जास्त
- प्रवचने : ५०० हून अधिक
- शोधनिबंध प्रकाशित : १०० हून अधिक
- स्वलिखित पुस्तके (प्रकाशित) : ९७
- स्वलिखित पुस्तके (आगामी) : ६
- संशोधन प्रकाशने : १६
- परिषद / सेमिनार / कार्यशाळेत सहभाग (आंतरराष्ट्रीय, राष्ट्रीय आणि राज्यस्तरीय) : ४०
- परिषद / सेमिनार / कार्यशाळेत स्रोत-व्यक्ती / तज्ज्ञ म्हणून सहभाग : २०० हून अधिक
- पुरस्कार : २०० पेक्षा जास्त
- मिळालेल्या शिष्यवृत्ती : ९
- डॉ. मंजूषा यांच्या मार्गदर्शनात पीएच.डी. पदवी प्राप्त विद्यार्थी : ०५
- डॉ. मंजूषा यांच्या मार्गदर्शनात पीएच.डी. संशोधन कार्य सुरू असलेले विद्यार्थी : ०४

• • •